# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. ४१ // स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक : ०२/०२/२०२१**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.०२/०२/२०२१ मंगळवार रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती पाटील राजेंद्र झिपरू यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त. खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. पाटील राजेंद्र झिपरू सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | कोल्हे ललित विजय |
| सोनवणे मुकुंदा भागवत | काळे अमित पांडुरंग |
| देशमुख प्रतिभा गजानन | पाटील कुलभुषण विरभान |
| काळे रेश्मा कुंदन | लढढा नितीन बालमुकुंद |
| बेंडाळे उज्वला मोहन | नाईक प्रशांत सुरेश |
| नेरकर सरिता अनंत | शेख सैईदा युसुफ |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिश कुलकर्णी, नगरसचिव ,श्री.सुनिल गोराणे, उपायुक्त, शाम गोसावी, उपायुक्त,प्रशांत पाटील, मुख्यलेखा परिक्षक, श्री.संतोष वाहुळे, मुख्यलेखाधिकारी, श्री.कपिल पवार, सहा.आयुक्त, श्री.आकाश डोईफोडे व सहा.आयुक्त. श्री.पवन पाटील उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेला सुरुवात करण्यात आली.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा.सदस्य श्री.किशोर रमेश बाविस्कर यांचा रजेचा अर्ज आलेला असुन तो मा. सभापती महोदय यांनी मंजूर केलेला आहे. विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करण्यात येत आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** विषय थांबवा जरा, मला एक सांगा, अनुकंपाच्या विषयावर काय झाल,ते पहिले विषय करा, नितीन भाऊंनी, ज्योतीताईंनी मागच्या मिटींगला किती वेळा सांगितल,

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब मागच्या मिटींगमध्ये सांगितल होत आपण की, पुढच्या मिटींगमध्ये बोलु, पुढची मिटींग होईल तो पर्यंत आपण आस्थापना विभागाकडुन माहिती मागुन घेऊ. आपली मिटींग व्हायला ८-१० दिवस झाले. तर आस्थापना विभागाकडुन काय माहिती मागविली अनुकंपाबाबत त्या कॅन्डीडेटसबाबत. आयुक्त साहेबांनी सांगितल होत की, पुढच्या मिटींगमध्ये आम्ही सादर करु.

**श्री.नितीन लढढा :-** पुढची मिटींग नाही, एक महिन्याचा अल्टीमेटम होत सर. आपण १ फेब्रुवारी पर्यंतची मुदत दिलेली होती. आणि मी परवाही आपल्याला पोर्चमध्ये आठवण करून दिलेली होती की, सदरहु अनुकंपा धारकांचा विषय जो आहे तो अत्यंत गंभिर आहे. आणि त्या संदर्भात प्रशासनाने मागितलेल होत तितका वेळ आपण मान्य केला होता. परंतु ती मुदत संपुन गेलेली आहे. अजुनपर्यंत त्याच्यावर कार्यवाही झालेली दिसुन येत नाही. नेमकी खरी परिस्थिती काय आहे ती सभागृहासमोर निवेदन कराव आणि तदनंतरच सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी. नाही तर ही सभेच कामकाज थांबुन घ्याव. ही मिटींग तहकुब करावी. जेणेकरुन जर अश्या पध्दतीने लोकप्रतिनिधींना आश्वासन दिल जात. दिलेल्या मुदतीमध्ये जर विषय मार्गी लागत नसतील. तर मला सांगा या सभागृहात चर्चा करण्याचा अवचित्त काय राहणार आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब त्याच्यामध्ये दोन कॅन्डीडेट तर पुढच्या महिन्यात ऐजबार होत आहे. दोन कॅन्डीडेट त्या ६० लोकांपैकी ऐजबार होत आहे.

**श्री.नितीन लढढा :-** या सगळया गोष्टींच गांभिर्य कुलभुषण भाऊ आपण सभागृहामध्ये ज्योतीताई होत्या, सगळयांनीच सांगितलेल आहे की, जर कधी ती एक दलित महिला आहे ती आता दोन महिन्यानंतर रिटायर्ड होईल. कायम स्वरुपी त्यांच्या हक्कावरती गदा येईल. मग त्या नुकसानाला कोण जबाबदार राहणार.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** कर्मचाऱ्यांचेच मुल आहे ना ते आपले.

**सहा.आयुक्त, श्री.आकाश डोईफोडे :-** मागील स्थायी समिती सभेमध्ये आपण जे काही एक महिन्याचा टाईम दिला होता आणि मुलेप आणि आयुक्त साहेबांनी जे काही निर्देश दिलेले होते. एक महिना कमप्लीट आम्ही शनिवार रविवार सुट्टीच्या दिवशी सुध्दा येऊन जे काम केल होत, आतापर्यंत नाही झालेल्या सर्वच्या सर्व ८० नस्त्या आम्ही डॅक्युमेंटसह कमप्लीट केलेल्या आहे आता परंतु याच्यामध्ये दोन ते तिन थोडेश्या अडचणी

आलेल्या आहेत आता त्या अडचणींची आम्ही उपायुक्त आणि आयुक्त साहेबांशी चर्चा केली. यानंतर काय याबद्दल मी थोडेशे अडचणी मांडतो की, आता यात काय करता येईल. याबद्दल सर आपल्याला करतील. यानंतर थोडासा विषय असा येऊन गेला, एका शासन निर्णयामध्ये दि१३/०३/२००३ चा शासन निर्णय आहे. या शासन निर्णय मध्ये स्पष्ट उल्लेख आहे. शासन निर्णयाच्या निर्देशानुसार कार्यालयातील विभागातील सर्व पदांचा आढावा पुर्ण होऊन आकृतीबंधास उच्चस्तर सचिव समितीची मान्यता मिळाल्यावर त्याबाबतचे आदेश निर्गमित झाल्याशिवाय त्या त्या आस्थापनेवरील पदे भरण्यावर निर्बंध घालण्यात आलेला आहे. आणि सदर निर्बंध अद्यापही कायम आहे. परंतु जसा आपण पुढे गेलो, तर शासन निर्णयामध्ये जश्या जश्या सुधारणा झाल्या, त्या मध्ये निर्बंध उठविण्यात आलेले आहे. पण यासाठी आवश्यक असणारा आकृतीबंधाची गरज दिसुन येते. याच्यामध्ये स्पष्ट सांगितलेल आहे की, शासन असे आदेशीत करीत आहे की, ज्या विभागांच्या कार्यालयाच्या पदांचा आढावा पुर्ण झालेला आहे आणि उच्चस्तर समितीने आकृतीबंध मान्य केलेला आहे. त्या विभागातील कार्यालयातील जागा ५%, १०%, २०% जसे जसे आपण वयोमर्यादा वाढविलेली आहे किंवा पद संख्या वाढविण्याची अट वाढविलेली आहे. त्या प्रकारे भरता येतील. पण त्यासाठी आकृतीबंधाची आवश्यकता आहे. आणि यानंतर दुसऱ्या ठिकाणी अस पण सांगितलेल आहे की, जर शासनाची पुर्व मान्यता घेण्याची आवश्यकता नाही ज्या वेळेस आकृतीबंध मंजुर असेल. आता आकृतीबंध यासाठी ही पण एक गोष्ट गरजेची आहे. आकृतीबंध आपल्या नगरपालिका झाल्यापासुन जवळ जवळ २०१८-१९ मध्ये आपण आकृतीबंध पाठविलेला आहे. तो सुधारीत करून ३ ते ४ महिन्यापुर्वी तो पाठविलेला आहे. कुठली पदे आहेत. यामध्ये शिपाई वर्गाचे जी पदे आहेत. यामध्ये सरळ सेवेमध्ये सर्व जागा आपण भरु शकतो. परंतु लिपीक टंकलेखक आहे किंवा जे टेक्नीकल पदे आहेत. यासाठी आकृतीबंध खुप गरजेचा आहे.यासाठी आपल्याला ह्या जागा फिक्स करता नाही येऊ राहिल्या. फक्त वर्ग-४ च्या ज्या जागेबाबत हा निर्णय आपण आपल्या स्तरावर घेऊ शकतो. परंतु वर्ग-३ आणि टेक्नीकल पदांबाबत ही एक अडचण प्रामुख्याने जाणवली. जी कालच्या चर्चेत आयुक्त साहेब, उपायुक्त साहेब यांच्या निर्देशनास आणुन दिली. आणि दुसरा असा विषय की, सर्व निर्णयांचा एकत्रीकरण करुन दि.२१ सप्टेंबर २०१७ चा जो शासन निर्णय निर्गमित झालेला आहे त्यामध्ये पण थोडीशी अशी अडचण येऊन गेलेली आहे की, दोन गोष्टीमध्ये त्यांनी स्पष्ट केलेल्या आहेत. शासन निर्णयामधील नंबर-३ चा पॉईंट आहे. खालील दर्ज्याच्या पदावर अनुकंप नियुक्ती देय राहिल.राज्य शासनाअंतर्गत कोणत्याही गट क आणि गट ड मधील सरळ सेवेच्या पदावर त्या पदाच्या सेवा प्रवेश नियमातील विहित पध्दतीने नियुक्ती देय राहील. तर हा विषय पुन्हा आला, आकृतीबंध आणि सेवा प्रवेश नियमावली. सेवा प्रवेश नियमावली मध्ये दोन गोष्टींची क्लॅरीटी येते की, किती पदे सरळ सेवेने भरले पाहिजे आणि किती पदे पदोन्नतीने भरले पाहिजे. आकृतीबंध मंजुर नसल्याकारणाने आणि सेवा प्रवेश नियमावली मंजुर नसल्याकारणाने आज पद निश्चिती करण्यास खुप मोठी अडचण येत आहे. किंवा कश्याप्रकारे पदनिश्चिती करायच याबाबत पण सर आपल्याला मार्गदर्शन करतील. या पदांसाठी सेवा प्रवेश नियमानुसार सरळ सेवेस काय तरतुद आहे अश्याच पदांवर आपल्याला नियुक्ती देता येईल. तर या दोन गोष्टींची प्रामुख्याने अडचण येत आहे. पदनिश्चितीसाठी,

**श्री.नितीन लढढा :-** परंतु मला सांगा सर. ज्या ज्या शासन निर्णय आणि ज्या ज्या गोष्टी आता आपण अवगत करुन दिलेल्या आहेत. ही सर्वस्वी जबाबदारी कोणाची आहे. या सर्व गोष्टींचा विहित वेळेमध्ये पालन न केल याची जबाबदारी कोणाची आहे. आणि याला जबाबदार कोण आहे. मला सांगा, उद्या जर कधी ते सेवेपासुन वंचित राहिले त्यांच्यावर झालेल्या अन्यायाला जबाबदार कोण राहणार. आपण या सर्व त्रुटींच वाचन केल. येथे स्वतंत्र आस्थापना विभाग आहे. स्वतंत्र आस्थापना विभागाला खातेप्रमुख आहे. उपायुक्त आहे, या सगळया गोष्टींची जाग आपल्याला ज्या वेळेला सभागृहामध्ये चर्चा होते त्याच वेळेला कशाला आठवणी येतात. म्हणजे जो तो आपल्या कर्तव्यापासुन दुर का पळतो. म्हणजे ही काही सभागृहाची जबाबदारी आहे का ? प्रशासनाने एखादा विषय राज्य शासनाकडे मान्यतेसाठी सभागृहासमोर ठेवलेला असेल, सभागृहाने तो नामंजुर केलेला असेल किंवा सभागृहाने प्रलंबित ठेवलेला असेल, तर निश्चितपणे आपण समजु शकतो की, त्याला सभागृह जबाबदार आहे. परंतु हे प्रशासकीय कर्तव्याचा भाग असतांना सुध्दा, प्रशासन आपल्या कर्तव्यापासुन दुर का राहत आहे. आणि याच्यामध्ये जर कोणावर अन्याय होत असेल तर त्याची जबाबदारी कोण स्विकारेल.अनेक वर्ष झाले या गोष्टीला, सन २०१६ ला अनुकंपाची शेवटची भरती झालेली आहे. आज सन २०२१ येऊन गेलेल आहे. म्हणजे तब्बल ५-५ वर्ष प्रशासन झोपा काढतात का ? मागच्या मिटींगला या गोष्टीवर सुध्दा चर्चा झाली होती की, जर कधी शासकीय स्तरावर अडचणी असतील तर स्पेशल मॅसेंजर पाठवुन अश्या पध्दतीच्या

प्रकरणांना मान्यता घेऊन या. जेणे करु न त्याच्या संधी वाया जाणार नाही.ही सुध्दा चर्चा झालेली होती. मग त्याच्यावर काय प्रगती झाली. फक्त अभ्यासच चालु असतो का आपला, या गोष्टीचा सोक्षमोक्ष झाल्याशिवाय सभापती महोदय आपणास विनंती आहे की, या पुढील कुठलीही सभा चालु देणार नाही. आणि हे अत्यंत चुकीच आहे. जर कधी सभागृहातील सन्मा.सदस्यांचा अश्या पध्दतीने अवमान होत असेल आणि आपल्या कर्मचाऱ्यांना न्याय मिळत नसेल तर ही अत्यंत गंभिर बाब आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आकृतीबंधाचा जो नियम आहे त्याच्या चौकटीत राहुन आपण सेवा प्रवेशच्या नियमानुसार आपण त्यांच ते करुन घेऊ शकता ना साहेब. सेवा प्रवेशचा जो नियम आहे आपला लाड बागी समितीचा त्याच्यानुसार आपण करुन घेऊ शकता ना साहेब चतुर्थश्रेणीचे. आपल्याला वारंवार ते सांगितल जात, आकृतीबंधाचा आराखडा नाही. हे जे सगळे नियम आहे, हे तर प्रशासनाच काम आहे ना साहेब हे, जेव्हा पासुन ते लोक येत आहे. म्हणजे ६-७ वर्षापासुन ते लोकं फिरत आहे भाऊ, ६-७ वर्षापासुन आपण त्यांना तेच नियम आणि तेच तेच सांगत आहे साहेब. त्याच नियम आणि चौकटीत आपण काम करु तेच सांगतो आहे साहेब.प्रशासन करत काय आहे. आपण एकच कारण सांगतो आकृतीबंध मंजुर नाही आकृतीबंध मंजुर नाही. हे कुठपर्यंत होत राहील. साहेब आपल्या महापालिकेतुन एक एक कर्मचारी निवृत्त होत राहील निवृत्त होत राहील,नविन पदास्थापनाच होणार नाही साहेब, मग शासकीय काम चालेल कस साहेब.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** जो पर्यंत हे विषय होत नाही तो पर्यंत सभा चालु नाही करायची.

**मा.सभापती :-** आयुक्त साहेब आपण मागच्या सभेमध्ये सौ.ज्योतीताई चव्हाण, नितीन भाऊ यांनी हा विषय केला हाता, अनुकंपाच्या भरतीबाबत, तर मागच्या वेळेस आपण आश्वासन दिल होत की, आज आपण याचा विचार करु. आणि आज पण जी समस्या आहे ही आपण मागच्या सभेमध्ये जर की मांडली असती तर आपण या स्टेजला आलो असतो की, कमीत कमी आपण चतुर्थश्रेणीचे जे लाभार्थी असतील त्यांचा आपण या महिन्याभरात निर्णय घेऊन टाकला असता. बरोबर ना. तो निर्णय झाला असता आणि जे क्लास थ्रीसाठी अडचणी आहे समजा, आकृतीबंध असेल त्याच्यासाठी सुध्दा मागच्या महिन्यापासुन पाठपुराव्याची सुरुवात झाली असती.म्हणजे आपली ही प्रोसिजर नेहमी नेहमी लाबुंन जाते. तुम्ही त्याच्यानंतर याचा अभ्यास केला का हा ?

**सहा.आयुक्त, श्री.आकाश डोईफोडे :-** नाही.

**मा.सभापती :-** त्यावेळेस तुम्हाला माहित होत ना की, या अडचणी येणार आहे म्हणुन तर हे आपण त्यावेळेला सभागृहाला अवगत करायच होत.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदय, दि.२४/१०/२०२६ ला जेव्हा आपण काही नियुक्त्या दिल्या होत्या. त्याच्यामध्ये अश्या पध्दतीची नोट पुटअप करण्यात आलेली आहे. दि.२६/१०/१९९४ आणि दि.३१/०८/२००५ च्या शासन निर्णयानुसार अनुकंपाच्या नियुक्तीसाठी आकृतीबंधाची अट लागु नाही. मग आता हा आकृतीबंधाचा विषय कशाला आला. हे २०१६ च आपल्याच विभागाच हे प्रकरण आहे आणि त्याच्याच नस्तीमध्ये हे पुटअप केलेल आहे की, दि.२६/१०/१९९४ व दि.३१/०८/२००५ च्या शासन परिपत्रकानुसार अनुकंपाच्या नियुक्तीस आकृतीबंधाची अट लागु नाही. मग आता कश्या पध्दतीने आकृतीबंधाची अट लागु झाली. म्हणजे आहे काय प्रकार. म्हणजे त्या कर्मचाऱ्यांना न्याय द्यायच नाही अस प्रशासनाने ठरवुन ठेवलेल आहे का ? काय ह्या सभागृहाला किमंत द्यायची नाही हे ठरवुन ठेवलेल आहे का ? म्हणजे एकदा प्रशासनाने आपली भुमिका स्पष्ट करु न द्यायला पाहिजे. आम्हाला नाही द्यायच अनुकंपाच्या कर्मचाऱ्यांना न्याय. नाही ऐकायच आम्हाला या सभागृहाच. आम्हाला जे मनात येईल तेच आम्ही करणार. अशी काही फुलगाठ बांधुन ठेवलेली आहे का प्रशासनाने. वारंवार एकाच विषयावर चर्चा करणेसाठी आम्हालाही काही आनंद येत नाही. परंतु झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने ज्या वेळेला स्वत: मा.आयुक्त महोदय यांनी सांगितल होत, आपण ८ दिवसाच सांगत होते अल्टीमेटम परंतु प्रशासनाने मा.उपायुक्त महोदय होते त्यावेळेला त्यांनी सांगितल की, साधारणता १ महिन्याचा कालावधी याला अपेक्षित आहे. आपण प्रशासनाच्या सुचनेनुसार १ महिन्याचा कालावधी ठरविण्यात आलेला होता. मग एक महिन्यामध्ये शासन स्तरावर असलेल्या अडचणी किंवा स्थानिक स्तरावर असलेली अडचणी किंवा जे काही नियम व अटीशर्तीच्या स्तरावर असलेल्या अडचणी यांना दुर करण्यामध्ये प्रशासन असमर्थ का ठरल. प्रत्येक वेळा या सभागृहात त्याच्या त्याच चर्चा करायचे का ? चर्चा करणेसाठी शहरामध्ये अनेक विषय आहे अनेक समस्या तोंड वासुन उभ्या आहेत. तरी सुध्दा आपण कर्मचाऱ्यांच्या जिव्हाळयाचा विषय आहे की, ज्यांच्या आई वडीलांनी ३०-३० वर्ष येथे सेवा केलेली आहे.

आणि त्यांनाच न्याय देण्याच्या संदर्भात जर कधी आपण असमर्थता दर्शवत असाल तर ही बाब काही योग्य नाही.

**मा.सभापती :-** आज आपल्याकडे कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे. आणि आपल्याकडे कर्मचाऱ्यांची संख्या कमी असतांना आज आपल्याकडे अनुकंपाचा विषय जवळ जवळ दिड ते दोन महिन्यापासुन सर्व पदाधिकारी असतील, सन्मा.सदस्य असतील

**श्री.नितीन लढढा :-** मागील दिड ते दोन महिन्यापासुन या विषयाची तिव्रता वाढली आहे. ही प्रशासकीय बाब आहे आणि ही निरंतर चालणारी बाब आहे. वास्तविक बघितल तर २०१६ ते २०२१ पण उजाडण्याची गरज नव्हती. ज्या ज्या वर्षी ज्या ज्या जागा रिक्त होतात. त्याच्या तुलनेमध्ये ज्या ज्या शासन निर्णयानुसार कधी ५% कधी १०% कधी २०% ही प्रक्रिया निरंतर चालायला पाहिजे. म्हणजे प्रशासन त्या कर्मचाऱ्यांवर उपकार करत आहे किंवा आपण जे म्हणतो आहे. त्यांच्यावर काही महेरबानी करतो आहे अश्यातला काही भाग नाही. हे संपुर्ण प्रशासकीय यंत्रणेचा दैनंदिन कार्यकाळाचा भाग आहे हा.

**मा.आयुक्त :-** सन्मा.सदस्यांनी मागच्या बैठकीत जो विषय उपस्थित केला होता.आजही याच्या बद्दल बहुतांश सदस्य अतिशय तिव्रतेने भावना व्यक्त करत आहे. प्रशासन याच्या बाबतीमध्ये विशेष संवेदनशिल आहेत. आपल्याच महापालिकेत काम करणारे आपलेच सहकारी ड्युटी करत असतांना मयत झाले. त्यांच्या वारसांना शासनाच्या नियमाप्रमाणे अनुकंपा तत्वावर नोकरी मिळायला पाहिजे. हा तर त्यांचा हक्क आहे. जसे मा.नितीन भाऊ म्हणाले आपण त्यांच्यावर उपकार करत आहोत असे नाही. जो हक्क आहे तो त्यांना दिला पाहिजे. परंतु याच्यामध्ये महानगरपालिकेची २००३ मध्ये स्थापना झाल्यानंतर जसा आता नितीन भाऊ म्हटले तो आणि का असा नोटींग केलेल आहे ते आपल्याला पाहव लागेल. परंतु आकृतीबंध हा जो विषय आहे २००१ च्या शासनाच्या निर्दशनास आला की, कर्मचाऱ्यांची भरती आणि कर्मचारी अस्थापना व राज्यात मर्यादीत ठेवण्यासाठी राज्य शासनाने असा निर्णय घेतलेला होता २००१ मध्ये सर्व कार्यालयांचे आणि अस्थापनाचे आकृतीबंधाचा आढावा घ्यावा. आवश्यक कोणती पदे आहे आवश्यक कोणती पदे नाही. याचा विचार करुन आकृतीबंध मंजुर करावा. त्यासाठी प्रत्येक विभागाच्या स्तरावर एक उच्चस्तरीय समिती राज्य शासनाने निश्चित केली होती. त्या समिती मार्फत आढावा धरुन यानंतरच अश्या प्रकारे जी पदे अंतिम होतील किंवा ते पदे मान्य होतील त्या पदांची भरती काढणे अश्या प्रकारचा २००१ चा निर्णय होता. आता जो पर्यंत आकृतीबंध मंजुर होत नाही तो पर्यंत कुठल्याही प्रकारची नियुक्ती करणे ते त्याच्या मध्ये आदेशीत नव्हत. आता याच्यामधुन काही गोष्टी निर्माण झाल्यात आणि त्या विषयांवर आपण चर्चा करतो आहे की, अनुकंपा तत्वावर नियुक्ती करत असतांना अश्या कर्मचाऱ्यांना वयोमर्यादा ठरवुन दिलेली आहे. म्हणजे ठरावीक वयोमर्याद्याच्या पुढे जर त्याच वय गेल, तर त्या पिरियड मध्ये त्याला नौकरी मिळाली नाही तर प्रतिक्षा यादीतुन त्याच नाव कमी करण्याचा आदेश शासनाचा आहे. आता हे करत असतांना २००३ च्या शासन निर्णयाप्रमाणे आकृतीबंध नसेल तर पदे भरायची नाही, ही आकृतीबंधाची अट अनुकंपालाही लागु करण्यात आली होती. परंतु त्याच्यानंतर निर्माण झालेल्या काही अडचणी विचारात घेऊन शासनाने २००३ मध्ये एक असा निर्णय घेतला की, ज्या दिवसा आकृतीबंध मंजुर होईल, त्या आकृतीबंधाला मंजुरी झाल्यानंतर त्याचे सेवा प्रवेश नियम मंजुर होतील. सेवा प्रवेश नियमामध्ये जी आपले आस्थापनेवरील पदे निर्माण होतील, त्याच्यापैकी किती पदे सरळ सेवेने भरायची आणि किती पदे पदोन्नतीने भरायची याच प्रमाण ठरवुन दिले जाणार. आता उदा. समजा आपल्याकडची आपण लिपीकाची पदे घेतली. तर काही पदे ही सरळ सेवेने भरली जातील उदा.वृतपत्रात जाहिरात देऊन वगैरे, आणि काही पदे वर्ग-४ मधील जे शैक्षणिक पत्रता धारण केलेले कर्मचारी असतील तर यांच्या मधुन पदोन्नती द्यायची. आता ते ५०-५० टक्के असेल, ७५-२५ टक्के असेल, जे काही महानगरपालिका प्रस्तावीत करेल आणि शासन मान्य करेल त्याप्रमाणे, आता एकदा सेवा प्रवेश नियम निश्चित झाले की, कोणते पदे कशे भरायचे. सरळ सेवेने कोणते भरायचे आणि पदोन्नतीने कोणते भरायचे, याच्यामध्ये अनुकंपाबाबतीत विषय असा आहे की, जी सरळ सेवेला पदे भरायची आहे, त्याच पदांचा विचार अनुकंपाखाली केला जातो. पदोन्नतीने भरायचे पदांवर अनुकंपात येणारे कर्मचाऱ्यांना नियुक्ती दिली जात नाही. त्यामुळे पहिल्यांदा आपला आकृतीबंध निश्चित करून घेणे उदहारणार्थ लिपीकांच उदहारण दिल तर त्यामध्ये किती लिपीकाचे पदे आहे, समजा १०० पदे मंजुर झाली, तर दुसरा टप्पा सेवा प्रवेश नियम, यामध्ये किती पदे सरळ सेवेने आणि किती पदे पदोन्नतीने, समजा ५०-५० टक्केचा रेशो शासनाने मंजुर केला. तर लिपीकाचे १०० पैकी ५० पदे आपण सरळ सेवेने भरु शकतो. आता या ५० टक्के पैकी अनुकंपाला ५ टक्के

पासुन सुरूवात झाली. हे जे ५० पदांपैकी जी पदे रिक्त होतील त्या वर्षामध्ये त्या रिक्त झालेल्या पदांच्या ५ टक्के ऐवढी पदे तुम्ही अनुकंपाखाली भरा. आता पदोन्नतीच प्रमाण सहा.आयुक्तांनी सांगितल्या प्रमाणे, ५ टक्के, १० टक्के साधारणता २० टक्के पर्यंत आहे. आता २००३ च्या निर्णयाप्रमाणे नगरपालिकेच्या बाबतीमध्ये त्या वेळेला आकृतीबंधाची प्रक्रिया त्या ठिकाणी सुरु झाली. नगरपालिकातर्फे त्या वेळेस २००६-०७ मध्ये आकृतीबंध मंजुर झाले. त्याच्या मध्ये अशी अट टाकली की, दर पाच पाच वर्षाने त्याचा शासन पुर्नविचार करेल. आणि या पाच पाच वर्षाच्या पुर्नविचाराच्या निर्णयाला सुध्दा शासनाने मुदतवाढ दिलेली आहे. मी आताच उपायुक्तांना विचारले की, ते कालपर्यंत नगरपालिकेतच काम करत होते. नगरपालिका मध्ये सुध्दा जो आकृतीबंध २००६-०७ ला मंजुर झाला. २००६ पासुन शासन अजुन ही त्या आकृतीबंधावर काम करायची सुचना देत आहे. आता आपल्या महानगरपालिकेची स्थापना २००३ मध्ये झाल्यानंतर आपण आकृतीबंधाच्या नियमामधुन बाहेर आलो परंतु महानगरपालिका म्हणुन आपल्याला जो आकृतीबंध निर्माण करून घ्यायचा होता. तो प्रस्ताव आपणाकडुन प्रशासनाकडुन म्हणुया किंवा महानगरपलिकेकडुन म्हणुया की, तो प्रस्ताव आपण शासनाकडे वेळेवरती पाठवु शकलो नाही. आणि तो पहिल्यांदा प्रस्ताव आपण सन २०१८-१९ मध्ये तो आकृतीबंध पाठविला,दरम्यान २००६ मध्ये राज्य शासनाने महानगरपालिकेचा आदर्श आकृतीबंध कसा करावा याच्या बद्दल एक धोरणात्मक निर्णय ठरवुन दिलेला होता. २००६ च्या त्या आदर्श आकृतीबंधाच्या धोरणाप्रमाणे आपण आपल्या महानगरपालिकेला आवश्यक असणारी लोकसंख्या आणि क्षेत्रफळ याचा विचार करून जर आपण प्रस्ताव पाठविला असता खरोखर तर कदाचित आपल्याला अशी अडचण आली नसती. आपला वेळेमध्ये आकृतीबंध मंजुर झाला असता. परंतु तो आकृतीबंध वेळेत आपल्याकडुन शासनाकडे गेला नाही. सन २०१८-१९ मध्ये गेला, त्याच्यामध्ये शासनाने काही त्रुटया दर्शविल्या. आणि आता त्याच्यात मागच्या ३-४ महिन्यापुर्वी पुन्हा या सर्व त्रृट्यांची पुर्तता करुन पुन्हा हा आकृतीबंध आपण राज्य शासनाकडे पाठविलेले आहे. ते करत असतांना राज्याच्या सर्व आयुक्तांनी सन्मा.नगरविकास मंत्रींनी बैठक घेतली होती मुंबई मध्ये. त्या बैठकीमध्ये प्रत्येक महानगरपालिकेचे जे काही प्रमुख प्रश्न राज्य शासनापुढे आले. त्याच्यावरुन राज्य शासनाने काही तरी हस्तक्षेप करुन दखल घेणे आवश्यक आहे अश्या प्रकारचे मुद्दे त्या आयुक्तांनी मांडण्याच्या सुचना दिलेल्या होत्या. त्याप्रमाणे आपले जळगांव महानगरपालिकेचे जे काही शासन स्तरावर प्रलंबित विषय आहे. त्याच्या मध्ये सन्मा.नगरविकास मंत्री आणि नगर विकास खातेचे मा.प्रधानसचिव या दोघांच्या पुढेही जे आपले महानगरपालिकेचे जे प्रश्न आहे प्रशासकीय स्वरुपाचे ते मांडत असतांना आपण आकृतीबंधाचा हा एक विषय मांडलेला आहे.असे जवळपास ६-७ महानगरपालिकांचे आकृतीबंध मंजुर व्हायचे काही जणांचे सुधारीत व्हायचे आहेत. सन्मा.नगरविकास मंत्री यांनी त्याच वेळेला नगरविकास प्रशासनाला सुचना दिलेल्या आहे की, ज्यांच्या बाबतीमध्ये आकृतीबंध मंजुर करत असतांना प्रामुख्याने महानगरपालिकांना परवानगी दिलेली आहे त्यात आस्थापना खर्चाची अट आहे. त्या अटीच्या अडचणीमुळे सन्मा.सचिव महोदयांनी त्या बैठकीमध्ये स्पष्ट केलेले आहे. महानगरपालिकांच्या बाबतीमध्ये एकुण आपल्या उत्पन्नाच्या जास्तीत जास्ती ३५% एवढाच खर्च आस्थापनेवर खर्च होतील. याला शासनाने मर्यादा ठरवुन दिलेली आहे. आपल्या कर्मचाऱ्यांच्या आस्थापना वरील होणारे खर्च आणि आपला आर्थिक उत्पन्न त्याच जर प्रमाण आपण विचारात घेतल. तर मागच्या वर्षी मुख्यलेखाधिकारींनी माझ्याकडे सादर केल ते काही तरी ५२-५३ टक्के होत. कदाचित या वर्षी थोडफार कमी जास्त होईल तेच प्रमाण आहे. आता बऱ्याच महानगरपालिकांची हीच अडचण आहे की, त्यांचा आस्थापना वरील खर्च ३५% पेक्षा कमी नाही. ३५% पेक्षा जास्त आहे. आता अश्या परिस्थिती मध्ये शासनाच्या धोरणाप्रमाणे त्याचा ओलांडुन गेलेला असल्यामुळे आकृतीबंध मंजुर करण्यात येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन शासनाकडे याचा पुर्नविचार केला जाईल. त्याच्यामध्ये काही अटीशर्ती लाऊन पुढील कामकाज मर्यादीत राखावा.जरी ही आकृतीबंध मंजुर झाला, तरीही पदोन्नती करतांना आकृतीबंधाची, म्हणजे आस्थापना खर्चाची मर्यादा पाळावी.उत्पन्नामध्ये वाढ करावी. अश्या काही धोरणात्मक अटी टाकुन महानगरपालिकेने आपल्याला कन्डीशनल आकृतीबंध मंजुर करता येईल का ? त्या तपासुन पाहण्याचे सुचना आदरणीय नगरविकास मंत्री यांनी दिलेल्या होत्या. आणि त्याच्या प्रमाणे म्हणजे साधारणता मार्च पर्यंत या आकृतीबंधावर काही तरी सकारात्मक निर्णय शासनाकडुन होणे अपेक्षित होत. अर्थात याच्यात भविष्यकाळातला आकृतीबंध मंजुर करत असतांना याच्यामध्ये आस्थापनाच्या खर्चावर महानगरपालिका काय करु शकेल याचा एक आराखडा राज्य शासनाला मागच्या दोन तीन महिन्यापुर्वी पाठविलेला आहे. ज्याच्या मध्ये आपण हे म्हणत आहोत की, येत्या वर्षापासुन आपण घरपट्टीच म्हणजे प्रॉपर्टी टॅक्सची रिव्हीजन झालेली नव्हती. माझ्या माहिती प्रमाणे १९९९ ला

जी रिव्हीजन झाली होती. आता ते रिव्हीजनच काम आपण गेल्या २ वर्षापासुन हाती घेतलेल आहे. या वर्षी काम पाहता पुढच्या वर्षाच्या सुरूवातीला हे काम पुर्ण होईल. आपल दुकान गाळयांच जे गेल्या ७-८ वर्षापासुन प्रलंबित असलेला प्रश्न आहे. ते ही मार्गी लावण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्नशील आहोत. हे जर दोन्ही विषय मार्गी लागले तर आपले उत्पन्नामध्ये भव्य स्वरूपात वाढ होणार आहे. आणि मग हा खर्च जो आपला आस्थापनावर दिसतो ते आपल्याला शासनाने ठरवुन दिलेल्या मर्यादेच्या जवळपास आपल्याला आणता येईल. अश्या प्रकारचा प्रस्ताव आपला राज्य शासनाकडे गेलेला आहे. आणि या प्रकारे हा आपला प्रयत्न चालु आहे की, लवकरात लवकर आपला आकृतीबंध मंजुर व्हावा. आता मागच्या बैठकीमध्ये जो सन्मा.श्री.नितीन भाऊ लढढा यांनी मुद्दा उपस्थित केला होता की, आपण एक महिन्यामध्ये, आता या एक महिन्याच्या मुदतीमध्ये आस्थापना विभागाकडुन या सर्व प्रकरणांची छाननी करण्यात आली, त्याच्या मध्ये ज्याकाही ६० जागा आपल्याकडे येऊ शकतील असा एक प्राथमिक अंदाज आला. त्या जागा निश्चित करत असतांना त्याच्यामध्ये जसा आता सहा.आयुक्तांनी सांगितल त्याप्रमाणे यापुर्वीचे सर्व जी.आर. एकत्रीत करुन राज्य शासनाला २०१७ मध्ये ते एक नविन धोरणात्मक निर्णय घेतल की, ज्याच्यामध्ये तुमचा एक आकृतीबंध मंजुर झाला पाहिजे. आकृतीबंध मंजुर झाल्यानंतर तुमचे जे एकुण पदे आहे त्यात सेवा प्रवेश नियमावलीनुसार सदर सेवेसाठी उपलब्ध असणाऱ्या पदांच्या रिक्त झालेल्या पदांच्या ५% की, आता एवढी पदे तुम्ही भरा.आणि ही जी पदे आपल्याला मंजुर झालेली आहे ह्या मंजुर पदांसाठी आपल्याला राज्य शासनाच्या मागासवर्गीय कक्षाकडुन आपली बिंदु नामावली जी आहे. मागासवर्गीयांसाठी, रोस्टर आपण त्याला म्हणतो, हे रोस्टर जे आहे. हे रोस्टर तपासुन घ्यायच आहे.आणि ते रोस्टर तपासुन घेतल्यानंतर त्या रोस्टर मध्ये ज्या सामाजिक घटकासाठी जी जागा असेल त्या घटकाचा व्यक्ती अनुकंपासाठी त्या पदासाठी भरला गेला पाहिजे. म्हणजे उदहारणार्थ अनुसुचित जातीसाठी जागा असेल तर त्याच्यात अनुकंपाखाली एक नंबरवर एस.टी.चा असेल, एन.टी.चा असेल, ओपन कॅटेग्रीचा उमेदवार असेल त्याची नियुक्त तेथे करता येणार नाही. म्हणजे कोणत्या पध्दतीने आरक्षणाला धोका पोहचणार नाही. अश्या पध्दतीने पदे द्यायचे. म्हणजे आकृतीबंध, सेवा प्रवेश नियम आणि त्याच्यानंतर रोस्टर या तिन्ही गोष्टीची पुर्तता करुन घेऊन मग हे करावा लागणार आहे. आता आपल्याकडुन झालेला विलंब याची जबाबदारी निश्चितच आपली आहे. याच्यात काही दुमत नाही. आता राज्य शासनाने लागु केलेली ४५ वर्षाची मर्यादा, त्या ४५ वर्षाचे वर उभरणारे उमेदवारांना आपल्याला नाईलाजाने त्या प्रतिक्षा यादीतुन कमी कराव लागत. आता याच्या बाबतीमध्ये सुध्दा ४५ वर्षाची वयोमर्यादा राज्य शासन बाळगत आलेला आहे. आता जे ४५ वर्षाचे आहे, परंतु हे प्रशासकीय कारणामुळे झालेल्या विलंबाचा फटका हा ज्यांची काही चुक नाही अश्या उमेदवारांवर येत आहे ही वस्तुस्थिती आहे. आता या सर्व कारणानंतर आपण अनुकंप तत्वाखाली आपण नियुक्ती करु शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतु याच्यामध्ये माझी सन्मा.सभागृहाला विनंती राहिल याच्या मध्ये की, आपण ऑलरेडी हा प्रस्ताव पाठविलेला आहे. आकृतीबंध मंजुर व्हायला आपल्याला काही वेळ लागेल, याच्यामुळे मोठ काम अटकुन गेलेल आहे. त्याच्यामध्ये आम्ही प्रशासनाच्या वतीने आपण सुध्दा राजकीय पदाधिकाऱ्याच्या मदतीने, जर राज्य शासनाची आपण अशी मंजुर घेऊ शकतो. आकृतीबंध मंजुर होईल या अटीला अधिन राहुन जो नगरपालिका कालावधीत मंजुर झालेली पद आहेत. त्या पदाला अधिन राहुन आम्हाला जर तुम्ही तात्पुरत्या स्वरूपामध्ये अनुकंपाखाली भरती करायला जर मान्यता दिली. तर हे जे आता पुढच्या महिन्या दोन महिन्यामध्ये ४५ वर्षाचे या प्रतिक्षा यादीतुन कमी होणारे उमेदवार आहे. त्यांच्यावरती अन्याय होणार नाही. आणि आपण जे म्हणत आहोत की, महानगरपालिकेमध्ये कर्मचाऱ्यांची आवश्यकता भाजते. ते कर्मचारी ही भरती होऊन जातील. आणि आकृतीबंध निश्चितच पाहिजे आपल्याला की, जो नगरपालिका काळामध्ये जी मंजुर झालेली पदे आहे. त्याच्यापेक्षा महानगरपालिकेचे पदे कमी होण्याच काहीच कारण नाही. आपली लोकसंख्या वाढलेली आहे. आपली दवाखान्याची भरती २००१ च्या आगोदर झालेली आहे. हे सगळ जर विचारात घेतले, तर कुठल्याही परिस्थितीमध्ये नगरपालिकेचे जी मंजुर झालेले पदे होते. ते महानगरपालिका झाल्यानंतर कमी होतील अशी शक्यता नाही. काही प्रमाणामध्ये निश्चितच वाढतील.ही सगळी बाब जर आपण राज्य शासनाच्या निदर्शनास आणुन दिली. आणि जर आपण प्रयत्न केला. तर एक आपल्या राज्य शासनाची मान्यता मिळेल. आपल्याकडुन ज्या गोष्टीची पुर्तता होणे बाकी होत्या ती पुर्ण झालेल्या आहे. आता धोरणात्मक निर्णय हा राज्य शासनाच्या पातळीवरच प्रलंबीत आहे. अश्या वेळेला जर आपण आकृतीबंधाला मान्यता घेतली. आणि हे जरी पदे भरु शकलो. तर या उमेदवारांवरचा अन्याय दुर होईल आणि आकृतीबंधाची आपल्याला अडचण येणार नाही. जर आकृतीबंध मंजुर झाला तर

आपल्याला मागासवर्गीय कक्षाकडुन रोस्टर तपासुन घेणे ही बाब काही फार अवघड नाही. आपल्याला ते झटपट करुन घेता येईल. आणि या उमेदवारांवरचा जो संभाविक अन्याय आहे ४५ वर्षानंतरचा ते आपल्याला दुर करता येईल. माझी विनंती इतकीच आहे याच्यामध्ये आपल्याकडुन झालेला विलंब विचारात घेता आता आपल्याला राज्य शासनाकडुन एक तर आकृतीबंध तातडीने मंजुर करून घेणे किंवा त्याला वेळ लागणार असेल तर तो पर्यंत आकृतीबंधाला अधिन राहुन अनुकंपाच्या पदांसाठी मान्यता घेणे यापैकी एका पर्यायाची आपल्याला राज्य शासनाकडुन पाठपुरावा करुन मान्यता प्राप्त करून जर घेतली, तर हा प्रश्न सुटेल आणि या निमित्ताने आकृतीबंधही मान्य केला जाईल. आणि या आकृतीबंधामुळे निसते अनुकंपाचे पदे भरली जातील अस नाही. आपल्या रेग्युलर पदोन्नत्या आपण अनेक वर्षापासुन देऊ शकलो नाही. कालबध पदोन्नत्या आपण देऊ शकलो नाही. या सर्व ज्या बाबी आहे हे आकृतीबंध आणि सेवा प्रवेश नियम या निगळीत असल्यामुळ हा सगळेच कर्मचाऱ्यांचा जो प्रश्न आहे तो मार्गी लागु शकेल अस माझ म्हणण आहे. आस्थापना विभागाकडुन जे काही ६० प्रकरणे तपासण्याची झालेली आहे, त्यांच्याकडुन हा मुद्दा राहुन गेला असेल सांगायचा. पण बऱ्याच प्रकरणांमध्ये जी २०१७-१८ मध्ये त्या वेळेच्या आयुक्तांकडुन काही प्रकरण आलेली होती. त्याची काही फाईल्स काल दाखविल्या मला, आणि नविन उपायुक्तांनी ही पाहिल्या. अनुकंपाच्या बाबतीत जे आपले कर्मचारी सेवा करतांना मयत झाले. त्यांचे नियुक्त्यांमध्ये ही आक्षेप आहे. त्यांचे नियुक्त्या त्या वेळेच्या नियमाप्रमाणे झालेल्या नाही अश्या काही फाईलींवरती अभिप्राय असल्यामुळे त्याही त्यावेळेला रिजेक्ट झालेल्या आहेत. आणि बहुतांशी कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या या तात्पुरत्या स्वरूपात झाल्याची नोंद आहे. तात्पुत्या स्वरुपात लागलेला कर्मचारी जर आस्थापनेवरती कायम नाही झाला तर त्याला कुठल्याही कायम कर्मचाऱ्याला सेवानिवृत्त झाल्यानंतर मिळणारे जे फायदे आहे ते मिळत नाही. म्हणजे काहींच्या बाबतीमध्ये तांत्रीक अडचणी आलेल्या आहेत. आपले बरेच कर्मचारी आपण बघतो की, वयोमर्यादेची त्या वेळेला पाहणी केली गेलेली नाही किंवा बहुतांशी कर्मचाऱ्यांची वयोमर्यादा शिथील करण्याचे प्रस्ताव आपल्याला पाठवावे लागतात. काही पदोन्नतीमधील केसेस आहे. या सगळया ज्या विशेष बाबी आहे.यामुळे काही प्रकरणांमध्ये अडचणी येत आहे. आता नविन छाननी आता पर्यंत पुर्ण नाही झाली. पण आता जे सहा.आयुक्त आणि उपायुक्तांनी मला सांगितल की, हे ६० प्रकरणे आहे जी अनुकंपाच्या सगळया नियमाला पात्र ठरतात. आता काय चर्चा म्हणुन आपण हा मुद्दा घेतलेला आहे आता पर्यंत निर्णय कुठलाही घेण्यात आलेला नाही. पण या सगळया अडचणी आहेत. पण याच्या मध्ये या उमेदवारांबद्दल सभागृहाला असेलेली सहानुभुती प्रशंसास्पद आहे. परंतु केवळ सहानुभुती बाळगुन चालणार नाही. त्याच्या मधील सर्व तांत्रिक अडचणी दुर करून अनुकंपाचा प्रश्न आपल्याला मार्गी लावायच आहे. मला वाटत की, आपण सगळे मिळुन राज्य शासनाकडुन काही मार्ग काढण्याचा प्रयत्न करु या. आपली सर्वांची आम्हाला याच्या मध्ये निश्चितच मदत लागेल.

**श्री.नितीन लढढा :-** साहेब एक महिन्यापुर्वी झालेल्या चर्चेमध्ये या पध्दतीची चर्चेचा सुर असता तर कदाचित हा एक महिना वाया गेला नसता. म्हणजे या सभागृहाला तुम्ही मुर्ख समजता का ? म्हणजे एक महिन्यापुर्वी या सर्व गोष्टी निदर्शनास आणण्याची गरज जे कोणीही अधिकारी असतील त्यांना वाटली नाही का ? म्हणजे याचाच अर्थ त्या वेळेला सभागृहाची कुठलाही अभ्यास न करता सभागृहाची दिशाभुल करण्यात येत होती का ? म्हणजे ज्या वेळेला सभागृहामध्ये सदस्य आक्रमक होतात, चर्चा करतात, त्या प्रत्येक सभेमध्ये एक वेगळ कारण दर्शविला जातो. आणि हा प्रवास गेल्या ५ वर्षापासुन सुरु आहे. म्हणजे याचा अर्थ काय की, प्रशासन याच्यावरती कुठल्याही प्रकारे गंभिर नाही. प्रत्येक वेळेला एक नविन शासन निर्णय, एक नविन त्रुटी अश्या पध्दतीने या सभागृहासमोर आणायची. आणि सांगायच की, या त्रुटीमुळे आपल्याला यांना न्याय देता येत नाही. म्हणजे ती मंडळी, अपेक्षेवरती असतात. आणि सभागृह पोटतिळकीने त्याच्यावर चर्चा करत असतो. परंतु प्रशासन कुठेतरी सभागृहाची दिशाभुल करत आहे हे त्याचा पुरावा आहे. कारण एक महिन्यापुर्वी झालेल्या चर्चेमध्ये जर कधी या सर्व गोष्टी चर्चेला आल्या असत्या. आणि ही वस्तुस्थिती कळविली असती. तर एक महिन्यामध्ये सभागृह सदस्यांनी सन्मा.शहराचे आमदार आणि मा.पालकमंत्र्यांच्या माध्यमातुन कुठेतरी या विषयाला चालना देण्याच्या दृष्टीकोणातुन प्रयत्न केला असता, आता ते प्रयत्नाला सुरुवात केल्यानंतर समजा ती महिला कर्मचारी, तिची वयोमर्यादा समाप्त झाली, तर ही जबाबदारी कोण स्विकारणार, याची जबाबदारी कोणी घेत का प्रशासनात, परंतु त्याच्या आयुष्यातली कायमची संधी हिरावली जाते त्याला जबाबदार कोण राहणार, आणि ती संधी कुठल्याही परिस्थिती परत येऊ शकणार नाही. अत्यंत गंभिर असा विषय आहे सभापती महोदय, आपण खुप विषयांसाठी सभागृहात भांडतो, परंतु फलनिष्पत्ती जी आहे ती या चर्चेद्वारे अश्या

पध्दतीने ताटकळत राहते. म्हणुन मला वाटत या सभागृहामध्ये चर्चा करण्यामध्ये आणि काम करण्यामध्ये सदस्याचा सुध्दा स्वारस्य कमी कमी व्हायला लागलेला आहे.

**नवनाथ दारकुंडे:-** इतक्या दिवस फाईली नाही पाहिल्या होत्या आता फाईली पाहिल्या आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब मी मागच्या मिटींग मध्येच बोललो होतो की, आपले कर्मचारी आणि अधिकारी किती गेंडयाच्या कातडीचे आहे. समोरच्याच काही होत जात अशीन परंतु त्यांना त्या विषयावर काही चिंता नाही की, समोरच्याच काय ? त्यांचा फायदा होत आहे की, नुकसान होत आहे. ते फक्त त्यांच्या मस्तीत आहे. काम करण्याची इच्छा नाही, हे सर्व या गोष्टीवरुन स्पष्ट होत आहे साहेब, जे मी मागच्या स्टॅण्डींगची मिटींगमध्ये बोललो, त्याची ही प्रचलिती आहे साहेब. ५-५ व ७-७ वर्ष आपले अधिकारी कर्मचारी काम नाही करत साहेब. याच्याने कोणाच काही नुकसान होऊन जाणार आहे. त्याच्या आयुष्याच नुकसान आहे साहेब हे. त्याच्यातले ४ कॅन्डीडेट ऐजबार झाले. आता दोन लोक महिन्याभराने एजबार होणार आहे. मग त्यांना न्याय मिळेल कधी आणि आपण द्यायच कधी. हेच नियम हेच अटी आपण नेहमी सभागृहासमोर सांगत असतो सदस्यांसमोर सांगत असतो मग साहेब त्यांनी जायच कुठे न्यायासाठी, आपले शहरातलेच आहे ना ते. शहराच्या बाहेरचे नाहीत ना साहेब.

**मा.सभापती :-** कुलभुषण भाऊ.

**श्री.कुलभुषण पाटील :-** काय करणार आहे त्यांना न्याय देणार आहे की, नाही देणार.

**श्री.प्रशांत नाईक :-** आपणच करायच ते पाठपुराव्याच प्रशासनाच काम.

**श्री.नवनाथ दरकुंडे :-** प्रशासनाने पाहिल का फाईलवर काय काय अडचणी आहे. आस्थापना विभाग काय करतो.

**मा.आयुक्त :-** कुटुंबामधील मुलगा, मुलगी ज्यांना आपल्याला संधी देता येईल हा ही एक मुद्दा आपण तपासुन पाहु. जेणे करुन त्या कुटुंबाची उदरनिर्वाहाची सोय होऊ शकेल.

**श्री.नितीन लढढा :-** तसा होत नाही ना साहेब, अश्या प्रकरणामध्ये तस कधीही सकारात्मक दृष्टीकोन दिसुन आलेलाच नाही. जे एकदा झाल,नाव यादीतुन वगळल गेल्यानंतर दुसऱ्याला संधी नाही.

**मा.आयुक्त :-** आता वारस नॅमिनी त्यांनी दिलेला आहे. तो वारस बदलता येत नाही अस सहा.आयुक्तांच म्हणण आहे. आपण तो मुद्दा तपासुन बघु. कर्मचाऱ्याला शासनाच्या निर्णयाचा लाभ कसा देता येईल. हा आपल्याला सकारात्मक विचार करायच आहे. लाड कमिटीचा कुलभुषणभाऊ आपण जो उल्लेख केला, तो लाड समिती जो आहे फक्त सफाई कर्मचाऱ्यासाठी आहे. अनुकंपात जे आहे, सेवेमध्ये असणारे कोणतेही जे कर्मचारी असतील, चतुर्थश्रेणीवर असतांना मयत झाले, मग ते वर्ग-३, वर्ग -४ कोणत्याही जाती धर्माचा असु द्या. लाड समिती जी आहे ते सफाई कामगारांना लागु आहे. आणि त्याच्यामध्ये सेवेमध्ये मयत झाले असे नाही, सेवानिवृत्त झालेवर त्यांच्या वारसाला, वारसच पाहिजे असा नाही. त्यांच संगोपन करणारा कोणीही व्यक्ती असेल. जर त्यांच्या कुटुंबाचा जरी नसला, त्याला आपण वशिला पध्दत म्हणतो, म्हणजे हे त्याचा वशिला आहे त्यालाही नियुक्ती मिळत होती. लाड समितीची जी पॉलिसी आहे, त्याच्या प्रमाणे रिटायर्ड झालेल्या किंवा मयत झालेल्या सफाई कामगाराला सांभाळ करणारे कुटुंब असतील किंवा काही असतील त्याला नौकरी मिळु शकते त्याला हरकत नाही. आणि त्याला आस्थापना खर्चाची ही मर्यादा नाही. आणि पद मंजुर असल्यामुळे तेथे आकृतीबंधाची ही अडचण नाही. फक्त सफाई कामगारापुरती ती आहे. अनुकंपाला चतुर्थश्रेणी, तित्याश्रेणी, द्वित्याश्रेणी सर्व कर्मचाऱ्यांना अधिकाऱ्यांच्या सुध्दा कुटुंबियांना ही योजना लागु आहे. लाडभाईचा कायदा फक्त सफाई कर्मचाऱ्यांना सोडुन बाकी कर्मचाऱ्यांना नाही.

**मा.सभापती :-** याच्यात चतुर्थश्रेणी मध्ये किती उमेदवार बसत आहे.

**सहा.आयुक्त, श्री.आकाश डोईफोडे :-** सन्मा.सभापती, प्रथमत: आपली सद्याची जी वेटींग लिस्ट आहे, प्रतिक्षा यादी आज पर्यंतची १०५ लोकांची आहे. आता ज्या मुलांच शैक्षणिक अर्हता वाढलेली आहे किंवा ग्रॅज्युएशन झाल, इंजिनिअरींग वगैरे झाली. असे आपले १० ते १२ मुल आहे सर. जागा निश्चित झाल्यानंतर जर हे १० ते १२ सोडले तर त्यापैकी सर्व चतुर्थश्रेणी आहे. अंदाजीत आपण ४०,४५ ते ६० म्हणु शकतो चतुर्थश्रेणी मध्ये आहे.

**मा.सभापती :-** याच्यासाठी आकृतीबंधाची आवश्यकता आहे किंवा नाही.

**सहा.आयुक्त, श्री.आकाश डोईफोडे :-** हो.

**मा.सभापती :-** तुम्ही मागच्या सभेला का नाही सांगितल हा विषय.

**सहा.आयुक्त, श्री.आकाश डोईफोडे :-** हा विषय मांडला ना सर की, आकृतीबंधाचीच याच्यात अडचण आहे.

**मा.सभापती :-** जर मागच्याच मिटींग मध्ये आपण हा विषय केला असता तर कदाचित आज हा विषय आलाच नसता. आपण त्याच दिवशी वरतुन वाटचाल सुरु केली असती.

**सहा.आयुक्त, श्री.आकाश डोईफोडे :-** सर २०१७ पासुन जे काही रिक्त होत, त्या दिवशी मा.आयुक्त महोदयांनी किंवा सन्मा.नितीनभाऊंनी जे काही सुचना दिल्या.सगळया नस्ती सन २०१७ पासुन चेक करायचे, सगळे डॉक्युमेट चेक करायचे, हे जवळ जवळ ९०% पुर्ण कम्पायलेशन केल्यानंतर १००% पैकी ९०% काम आम्ही कम्पलीट केलेल होत. फक्त जे आता शासन निर्णयाने ज्या अडचणी आल्या ते आपण मांडल्या.

**मा.सभापती :-** म्हणजे आकृतीबंधामुळे आपण लिपीकाचे, चतुर्थश्रेणीचे कोणतेही जागा आपण भरु शकत नाही. ही प्रोसेस लवकर कम्पलीट करावी.

**मा.आयुक्त :-** सर्व पद निश्चित करुन पदोन्नतीचे किती पदे आणि सरळ सेवेला किती पद येतात हे निश्चित करुन पदे भरता येईल.

**मा.सभापती :-** यांनी स्पेशल केस म्हणुन आपल्याला करता येईल का ? अनुकंप वाल्यांना,

**मा.आयुक्त :-** स्पेशल केस म्हणुन आपल्याला राज्य शासनाला हेच विनती करायची आहे. आकृतीबंध तुम्ही आमच मंजुर करा पण तोपर्यंत आमचे जे नगरपालिकेसाठी जी मंजुर पद आहेत. त्या नगरपालिकेच्या मंजुर झालेल्या पदांवर नियुक्ती देणेस परवानगी द्यावी. महानगरपालिकेच आकृतीबंध मंजुर होईल, पण हे पद महानगरपालिकेतुन नाही पण नगरपालिकेत तर मंजुर आहे. परंतू नगरपालिका असतांना मंजुर पद असतील तर ती पद महानगरपालिकेस नवीन मंजुर करावी लागतील. आपण दोन्हीही साईडने करु एक तर आकृतीबंध तातडीने मंजुर करावा. आणि त्याच्यामध्ये रिजर्व पदे असतील तर जे लोक एजबार होत चालले आहे त्यांच्यासाठी नगरपालिकेचे मंजुर पदे विचारात घेऊन असा आपण प्रस्ताव देऊ.

**श्री.नितीन लढढा :-** अनुकंपासंदर्भात तरतुदी या केवल शासकीय कर्मचाऱ्यांच्या यांच्या पुरत्याच सिमित आहे. सदर तरतुदी ह्या जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, महामंडळे, प्राधिकरणे, व्यापारी उपक्रम व इतर तत्सम कर्मचाऱ्यांना थेट लागु होणार नाही. त्यासाठी संबंधीत प्रशासकीय विभागाने स्वतंत्रपणे निर्णय घेणे आवश्यक राहील. म्हणजे तो निर्णय महासभेने घ्यावा किंवा सभागृहाने ठरवावा.

**मा.आयुक्त :-** मी खुलासा करतो, राज्य शासन ज्यांना पगार देत आहे, अश्या कर्मचाऱ्यांना आपण त्यांना शासकीय कर्मचारी म्हणतो, आपला जो कर्मचारी आहे तो महानगरपालिकेचा कर्मचारी आहे त्यामुळे राज्य शासनाचे काही निर्णय जसेच्या तसे आपल्याला लागु होत नाही. याला साधारण उदहारण म्हटल तर ७ वा वेतन आयोग, ७ वा वेतन राज्य शासकीय कर्मचाऱ्याला लागुन २ वर्ष झाले, परंतु तो वेतनआयोग आपल्याला लागु करण्यासाठी आता आपण नितीनभाऊ जे वाक्य वाचल की, त्या संबंधीत प्रशासकीय विभागाने स्वतंत्र आदेश कराव. त्यावेळेला नगरविकास विभागाने तसा आदेश काढलेला होता. आणि नगरविकास विभागाच्याच आपल्याला अश्या साईनींग ऑर्डर आहे की, येथे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीमध्ये नागरी सेवा आयोगामध्ये होणाऱ्या वेळोवेळी असणारे बदल आहे. ते जसेच्या तसे ते नगरपालिका आणि महानगरपालिका कर्मचाऱ्यांना लागु होतील. आता येथे जे आकृतीबंधाचा विषय आहे. तो आकृतीबंधाच्या विषयाला प्रशासकीय स्तरावर नगरविकास खात्याने मंजुरी दिलेली आहे किंवा ७ वा वेतन आयोग जरी राज्य शासकीय कर्मचाऱ्याला मंजुर झाला असता, तर आपल्या बाबतीमध्ये प्रशासकीय बाब आहे, जो पर्यंत नगरविकास विभाग मंजुरी देत नाही. तो पर्यंत वित्त विभागाचे जे आदेश आलेले आहे त्याप्रमाणे आपण देऊ शकतो.

**श्री.नितीन लढढा :-** आता कस आहे सर, तो अन्याय कोणाच्या चुकीमुळे झाला याच्या संदर्भात प्रशासन आजपर्यंत गंभिर का नाही ? प्रशासनाने आपल्या काही अधिक्षकांना बडतर्फ केल, सस्पेंड केल किंवा कोणावर तरी ती जबाबदारी फिक्स करावी लागेल ना. म्हणजे अश्या पध्दतीने चर्चा व्हायच्या, ज्यांच्यावरती अन्याय व्हायच त्यांच्यावरती अन्याय होत आहे. त्यांना न्याय मिळत नाही. आणि जे याला जबाबदार असतील. ते मात्र हातात फाईली घेऊन नेहमीची ठरविलेली कारणे देऊन मोकळे होतात. मग याला जबाबदार कुठपर्यंत टॉलरेट करायच. हे टॉलरेट कुठपर्यंत करायच. हाएका विभागाचा विषय नाही, हा प्रत्येक विभागाचा अनुभव आहे. मग जोपर्यंत जबाबदाऱ्या फिक्स होणार नाही. जो पर्यंत कुठल्या अधिकाऱ्यावर कार्यवाही होणार नाही. म्हणजे कार्यवाही सामान्य माणसावरच व्हायचीका ? की, सामान्य रस्त्यावर चालणारे माणसावरच दंडात्मक कार्यवाही करायची. प्रशासनाच्या कुठल्या अधिकाऱ्यावर अशी कठोर कार्यवाही झाली आहे अस आणुन द्याव प्रशासनाने. याच्यामुळे या संस्थेला कधीच शिस्तच लागणार नाही. प्रत्येक जण आपली आपली जबाबदारी झटकुन मोकळा

होईल. एक महिन्या पहिले सभेमध्ये धडधडीत उत्तर दिले जातात की, एका महिन्याच्या कालावधीत यांना आदेश दिले जातील. आणि एका महिन्याच्या कालावधीनंतर त्याच माध्यमातुन त्याच पध्दतीने आपण आहोत. त्याच ठिकाणी येऊन त्याच्यावर चर्चा करत आहोत. हा प्रकार काय आहे. हे चुकीच आहे सभापती महोदय, अश्या पध्दतीने सभेच कामकाज चालविण्यामध्ये कुठलच स्वारस्य नाही. संपुर्ण शहराचा एकमएक विषय पकडुन घ्या तुम्ही या स्वराज्य संस्थाशी निगडीत असलेला. कुठल्या पोझीशनवर समाधान मिळत आहे दाखवुन द्यावा. पाणी पुरवठेचा समाधान असेल, आरोग्याच समाधान असेल, दिवाबत्तीचा समाधान असेल, कुठल्याच प्रकारच्या विषयाला समाधान नाही. ईलेक्ट्रीकचा डी.पी.आर. पहिले लाईट लावले जातात नंतर डी.पी.आर. तयार होतो. आज सगळयाच बाबतीत परिस्थिती जी आहे ती अत्यंत भयाभय आहे. याची जबाबदारी प्रशासन स्विकारत का ? या सर्व गोष्टींचा फटका या लोकप्रतिनिधींनाच सोसावा लागतो. वाटेल त्या शब्दांमध्ये लोक अमृतात विष देऊन टाकतात.सकाळ पासुन ते रात्री पर्यंत रस्त्याने जातांना शिव्या खाव्या लागतात. एखादी पार्क केलेली गाडी बघा, तुम्ही परचेसींग करु न या. एक इंचाचा थर त्या गाडीवरती लागलेला असतो. याला जबाबदार कोण राहणार. ही सगळी मंडळी त्याच्यासाठी जबाबदार आहेत का ? तस असेल तर तस घोषित करु न टाका. या संपुर्ण शहराचा वाटोळा करण्यामध्ये ही सर्व लोकप्रतिनिधी जबाबदार आहे.कोणी आपली जबाबदारी स्विकारायला तयार नाही. आणि अश्याच पध्दतीने जर चालत राहिल असेल. ही दैनंदिन प्रक्रिया काय सकाळी १०.०० ला यायच आणि संध्याकाळी ५.०० ला जायायच, लोकप्रतिनिधींनी याच आपले कारणे मांडायचे, त्यालाही न्याय मिळणार नाही लोकांनी लोकप्रतिनिधींकडे जायच. त्याचेही पुर्ण पान पुसली जातात.हे कुठपर्यंत चालेल हे योग्य नाही सभापती महोदय, आणि अश्या पध्दतीने मी खरच म्हणतो, अत्यंत राग येतो या गोष्टींचा, लोकांनी लोकप्रतिनिधींना फक्त जोडे मारणे बाकी ठेवलेले आहे. आणि जोडे ही मारले लोकप्रतिनिधींना तर त्याचही वाईट वाटणार नाही. का कारण की, ही वस्तुस्थिती आहे. ती स्विकारावी लागेल एका दिवशी या लोकप्रतिनिधींना म्हणजे ज्या गोष्टी न्याय देणे प्रशासनाच्या हातात आहे. त्यालाही न्याय दिला जात नाही.

**मा.सभापती :-** आता आज आपला जो विषय चालु आहे. अनुकंपाचा त्याच्यावरती काय मार्ग काढता येईल.

**श्री.नितीन लढढा :-** मार्ग नाही, मला सांगा, आता आश्वासन घेऊन उपयोग नाही. प्रत्यक्ष कृती मध्ये जो पर्यंत तो विषय येत नाही तो पर्यंत मी म्हणतो, आपण सभा सुध्दा ठेवु नये. खुप काही मोठे विषय नाही. खुप काही दिवे लागणार नाही आपले.

**मा.सभापती :-** याच्यासाठी काय करावे लागेल साहेब आपल्याला

**मा.आयुक्त :-** आता याचा प्रस्ताव राज्य शासनाला पाठवुन आकृतीबंध किंवा आकृतीबंध नसेल तर काही तरी पर्यायी मान्यता द्या.

**श्री.नितीन लढढा :-** आयुक्त महोदय, आम्ही या सगळया गोष्टी अनेकदा ऐकली आहे. इतके पोटतिळकीने बोलण्याची वेळ का आलेली आहे याच चिंतन पहिले प्रशासनाने करायला पाहिजे. म्हणजे फक्त एवढी जबाबदारी झटकुन मोकळा होता येणार नाही.

**मा.सभापती :-** तुम्ही जे म्हणत आहे ना ते निश्चितच खुप चुकीच आहे परंतु आपल्याला हे करत असतांना कायद्याच्या चौकटीत राहुन करायचे आहे.

**श्री.नितीन लढढा :-** आपण कुठे म्हणतो आहे की, कायद्याची चौकट मोडा किंवा बेकायदेशीर करा.चार लोकांना न्याय मिळत असेल चार ला द्या, चाळीस लोकांना मिळत असेल चाळीसला द्या.

**मा.सभापती :-** आज घेतल्यानंतर त्यांच्यावर ही अन्याय व्हायला नको. उद्या आपण घाईगर्दी मध्ये निर्णय घेतला,

**श्री.नितीन लढढा :-** राजु भाऊ, घाईगर्दीचा काय प्रश्न आहे. २०१६ आज तब्बल ५ वर्ष झालेले आहे. ५ वर्षापासुन आपण पुन्हा पुन्हा तिच संधी उपलब्ध करुन घ्यायची. पुन्हा जर कधी कालांतराने हा विषय थंड अवस्थेत गेल्यानंतर पुन्हा ते रडत आपल्याकडे येतील, पुन्हा आपण त्यावेळेला सभागृहामध्ये चर्चा करु. आणि पुन्हा त्यावेळेला एक नविन उत्तर समोर येईल. अनेक उत्तरे या सभागृहाने ऐकुन घेतलेली आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ठोस निर्णय घेतल्याशिवाय पुढची सभा होऊ नये.

**श्री.नितीन लढढा :-** म्हणजे जे प्रशासन आपल्याच कर्मचाऱ्यांच्या वारसांना न्याय देण्याच्या बाबतीत गांभिर्य घेत नसेल. तर दुसऱ्या सामान्यांना काय न्याय देऊ शकेल.

**श्री.प्रशांत नाईक :-** राज्य शासनाकडे तर ५ वर्षापासुन प्रस्ताव दिलेला आहे.

**मा.आयुक्त :-** मला अस वाटत की, आपल्या असे वागण्या मागचा हेतु जो आहे. हाच आहे की, कोणावर अन्याय होऊ नये. परंतु आपल्याला गेलेला वेळ विचारात घेता, मला अस वाटत की, जी आपण चर्चा केली त्याच्या आधारे प्रस्ताव आपण पाठवु या. सन्मा.आमदार असतील, सन्मा.पालकमंत्री महोदय असतील यांच्या मार्फत आपण प्रयत्न करु. राज्य शासनाकडुन ही जी दोन पर्याय आहे, याच्यातुन जर एका पर्यायाला जरी मान्यता भेटली. तर आपली अडचणी दुर होईल. आणि या कर्मचाऱ्यांना आपण न्याय देऊ शकु. आणि दुसरे जे आपण विषय मांडलेले आहे नितीन भाऊ, हा अनुभव आपल्याला वेळोवेळी येत आहे की, ज्या गांभिर्याने काम व्हायला पाहिजे त्या गांभियाने काम होत नाही. स्टाफ कमी असल्यामुळे ती अडचण आहे. कर्मचाऱ्यांवर जादा कामाचा ताण आहे पण याच्यामधुन पण आपण कामाला प्राधान्य देऊन महत्वाचे विषय मार्गी लावले पाहिजे. जे गांभिर्य कर्मचाऱ्यांमध्ये आणले पाहिजे विशेष करुन ड-वर्गामध्ये. यासाठी आम्ही ही प्रयत्न करु. आणि हा विषय प्रशासनाकडुन जाणुनबुजुन म्हणा किंवा अनावधानाने म्हणा, विलंब होईल आणि नगरसेवकांना सुध्दा बऱ्याच प्रकारचे असे प्रकरणाला तोंड द्यावा लागेल.अश्या प्रकारची वेळ येण्यापुर्वीच आपण खबरदारी घेऊ. तसे मी तातडीने सगळे विभाग प्रमुखांना वेळोवेळी सुचना दिलेल्या आहे. याही पध्दतीने काम करुन घेऊ. मागच्या ६-७ महिन्याच्या कोरोनाच्या काळामध्ये काही विषय आपले मागे पडलेले आहे. याच्यामध्ये आपण यालाही गती देऊ आणि प्रशासन कसा गांभिर्याने आणि कार्यपध्दतीने काम करेल याचा आपण मार्ग निश्चित करु. उदासीनता होणार नाही किंवा आपण जे म्हणालात की, असा एक समज होतो की, सभागृहाचा काही मान वाटत नाही का ? किंवा सन्मा.सदस्य जे सभेमध्ये बोलतात त्याला काही महत्व नाही. निश्चितच आपल्या सर्व बाबींचा आपण उचित आदर ठेवुन प्रशासनामार्फत हे लवकरात लवकर विषय मार्गी लागतील हे प्रयत्न करु आपण सभागृहाचा मान निश्चितच राखला जाईल. त्याबाबत आपण अश्वस्थ रहा.

**मा.सभापती :-** तर आपण कुठल्या मार्गाने जायच.

**श्री.नितीन लढढा :-** धोरणात्मक निर्णय घेण्याच्या संदर्भात मर्यादीत आहे. या संपुर्ण बाबी जी आहे प्रशासनाशी निगडीत आहे आणि ही संपुर्ण प्रशासकीय व्यवस्थेने या गोष्टी सक्षमपणे हाताळायला पाहिजे. जर माझ्या सहीने येथे निर्णय होत असेल तर मी १० वेळा सह्या करुन देईन परंतु हा आमच्या कर्तव्याचा भाग नाही.आमच्या कर्तव्याचा भाग जो आहे की, ज्या कोणावर अन्याय होत असेल त्याच्यावर चर्चा या सभागृहात घडवावी. परंतु ज्याच्या जबाबदाऱ्या आहे त्यांनीच जर जबाबदारीच पालन केल असत तर मला वाटत कदाचित आपल्याला एवढे वेळ सभागृहात चर्चा करण्याची वेळ आली नसती. परंतु प्रत्येक वेळेला अश्याच पध्दतीचे ठरावीक उत्तर मिळत असतील. आणि प्रत्येक वेळेला त्या कर्मचाऱ्यांना या सभागृहाच्या माध्यमातुन अश्याच पध्दतीचे आश्वासन दिल जात असतील. आणि त्यांच्या वयोमर्यादेच जर उल्लंघन होत असेल. त्यांच्यावरती अन्याय होत असेल तो भरुन निघणार नाही ना. तुम्हाला मला फरक पडणार नाही. तुम्ही घराचे संपन्न आहात मी ही घराचा संपन्न आहे. परंतु ज्यांनी वर्षानुवर्ष या प्रतिक्षेमध्ये घालवली आहे. त्यांनी या प्रतिक्षेसाठी खाजगी नौकऱ्या सुध्दा सोडलेल्या आहे. की नाही माझी शासकीय नौकरी मला मिळेल.मला न्याय मिळेल येथे त्यांनी चप्पली गिसवलेले आहे. आणि उद्या जावुन त्यांची वयोमर्यादा संपल्यानंतर काय न्याय द्याल आणि काय आवश्वासन द्याल. कोणाची जबाबदारी ही, ही तुमची जबाबदारी राहिली असती तर निश्चितपणे आम्ही तुम्हाला जबाबदार पकडल असत. माझी जबाबदारी असती तर मला सभागृहाने जबाबदार पडकल असत.परंतु ज्यांची जबाबदारी आहे आणि ते त्यांचे कर्तव्यात कसुर करत असतील आणि त्यांच्या कर्तव्याच्या कसुरामुळे कोणावरती न भरुन निघणारा अन्याय होत असेल. तर त्यात कोणाला जबाबदार धराल.झाली का आता पर्यंत २०१६ पासुन किंवा आकृतीबंध २००३ पासुन का प्रलंबीत आहे. ही जबाबदारी सभागृहाची आहे का? की सभागृहात आकृतीबंध मंजुर करण्यासाठी प्रशासनाने प्रस्ताव पाठविला आणि तो या सभेत आम्ही नाकारला. किंवा सभागृहाने मंजुर दिली नाही. अशी घटना झाली असेल तरी ही हा सभागृह स्वत:ला जबाबदार धरेल. परंतु या सर्व गोष्टींना प्रशासन जबाबदार असतांना पुन्हा आपण या विषयावर चर्चा करुन पुन्हा प्रशासनाने दिलेल आश्वासन ऐकुन शांत बसाव हे आपल्यासारख्या बुध्दीला पटत नाही. म्हणुन योग्य निर्णय जो आहे सभापती महोदय आपल्यालाच घ्यायचा आहे. उद्या जाऊन यांच्यावर अन्याय झाला तर या सभागृहालाच शिव्या मिळतील. प्रशासन आज येथे आहे उद्या दुसरी कडे जातील. परंतु लोकप्रतिनिधी म्हणुन तुम्ही ५ वर्ष या शहरात राहाल. ५ वर्ष तुम्हाला शहरातले नागरीक तुम्हाला शिव्या घालतील. त्यांच कुटुंब तुम्हाला कायम शाप देत राहील.

**श्री.कुलभुषण पाटील :-** त्यांच्यावर अन्याय होणार नाही. वारंवार तेच विषय सभागृहासमोर आणण्यात भाऊंनी जस सांगितल काही स्वारस्य नाही पण आमच म्हणण आहे की, संबंधीत कॅन्डीडेटसला न्याय मिळाला पाहिजे साहेब. त्यांना न्याय कधी मिळेल. आम्ही वारंवार जे पोटतिळकीने सांगतो आहे. आमचा उद्देशच तो आहे की, हे कुठपर्यंत चालेल आणि कधी पर्यंत चालेल. साहेब याच्यावरती प्रशासनाचा काही अंकुश नाही का ? अधिकाऱ्यांवर आपला काही अंकुश नाही का ? तुम्ही आज काय निर्णय घेणार आहे साहेब तुम्ही आम्हाला आज अश्वस्त करा. आणि तेव्हाच पुढच कामकाज सुरु करा. विषय असा आहे साहेब की, याच्यामध्ये आपले जे कार्यरत कर्मचारी आहे त्यांच्या विभागीय चौकश्या चालु होत्या. परंतु काही लोकांच्या विभागीय चौकश्या होऊन त्यांना निकाल देखील दिले गेलेले आहे परंतु त्यांचे इन्क्रीमेंट थांबविले गेलेले आहे. त्यांनी वारंवार आपल्या स्थायी समितीला अपील केलेले आहे. त्यांच्या अपील स्थायी समिती समोर न ठेवता,परसपर प्रशासनाने त्यांचे निर्णय देऊन दिलेले आहे.असे पण प्रकार चालु आहे आस्थापना विभागात, साहेब आपण दखल घ्या आणि असे काही प्रकरण असतील ना ते मागुन घ्या साहेब. त्याची करंट पोझीशन काय आहे ते तर बघुन घ्या साहेब. कर्मचाऱ्यांवर अन्याय होतो ना साहेब, उत्साह नाही येत त्यांना काम करतांना. जर त्यांचे ५-५ ७-७ वर्षापासुन इनक्रीमेंट थांबले असतील तर ते काय काम करतील साहेब. जे दोषी असतील त्यांच्या बद्दल आमच काहीच म्हणण नाही त्यांच्यावर कार्यवाही करा. जे दोषी नसतील त्यांचे सगळे ते निकाली निघाले असतील प्रकरणे, तर यांचे इनक्रीमेंट थांबविण्याचे काय प्रॉब्लम का थांबविले काबर,

**मा.आयुक्त :-** आपण केसेस तपासु, आपल्याकडे काही स्पेसीफीक केसेस असतील, आणि समजा त्या वेळेला आयुक्तांनी काही तरी दिलेली शिक्षा असेल, त्याचा कालावधी पुर्ण झाला असेल. परंतु त्याची शिक्षा स्थायी समितीने कमी केलेली असेल. जे काही नियमाप्रमाणे झालेल असेल, आज त्यांची वेतनवाढ रोखणे गरजेचे नसेल आपण तसाही निर्णय घेऊ. केसेस जर तुम्ही दिल्या तर आपण त्याची दखल घेऊ. आपण शासनाकडुन मान्यता घेतल्याशिवाय नियुक्ती करु शकत नाही आपल्या काही मर्यादा आहे. एकतर शासनाकडुन अनुकंपाखालील पद भरतीला मान्यता घेऊ किंवा आपण आकृतीबंधाला मान्यता घेऊ. दोघांपैकी एकाला मान्यता घेऊन या कर्मचाऱ्यांचा अन्याय दुर करण्याचा आपण प्रयत्न करु या. मला अस वाटत की, आपण याची वस्तुस्थिती राज्य शासनाच्या निदर्शनास आणावी की, काही कर्मचाऱ्यांनी वयोमर्यादा ओलांडली आहे. आणि त्यांच्यावर अन्याय होऊ शकतो. तर मला वाटत राज्य शासन सुध्दा याच्यामध्ये आपल्याला नगरपालिकेच्या काळामधील जी पदे आहे ती पद संख्या विचारात घेऊन अनुकंपाखालील भरती करायला लावेल त्यात आपण काही नविन पदांची निर्मिती करत नाही. ऑलरेडी जी असलेली पद आहे, आपण जे आकृतीबंध आपण राज्य शासनाला सादर केलेला आहे. त्याच्यामध्ये सुध्दा आपण ही मागणी केलेलीच आहे. आणि २० वर्षापुर्वीची पदे आज निश्चितच आज कमी होणार नाही. ही बाब जर आपण राज्य शासनाच्या लक्षात आणुन दिली तर मला वाटत आपल्याला मान्यता घेण सोप जाईल. याच्यामध्ये आपण लोकप्रतिनिधींचीही मदत घेऊ. आणि राज्य शासनाची मान्यता घेऊन आणि सगळी जी पद भरती आहे, जे ६० कर्मचारी आहे. त्यांच्या वैयक्तीक सगळी फाईल तपासुन घेण्याची सुचना दिलेली आहे. राज्य शासनाची मंजुरी आली तर जे पात्र कर्मचारी असतील अनुकंपाचे त्यांची नियुक्ती करता येईल, जे अपात्र असतील त्यांची पुर्तता कशी करुन घ्यायची ते होईल. परंतु जस आपण म्हणता आहे जे पात्र असतील त्यांना तरी आपण नियुक्ती देऊन त्यांना न्याय देता येईल. आणि वास्तविक येणाऱ्या अडचणी आहे ते आपल्याला दुर करता येईल. या मार्गाने जर आपण गेलो तर आपल काम सुरळीत होईल. आणि या कर्मचाऱ्यांना न्याय द्यायला सोईचे होईल. आपण राज्य शासनाची लवकरात लवकर मान्यता आणण्याचा प्रयत्न करावा असा माझा दृष्टीकोण आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** साहेब हे काम करणे प्रशासनाची बाब आहे.

**मा.आयुक्त :-** राज्य शासनाला तसा प्रस्ताव पाठवेल, आणि सन्मा.आमदार साहेब असतील, सन्मा.पालकमंत्री महोदय आहे. त्यांच्या मार्फत पाठपुरावा करु या.

**श्री.प्रशांत नाईक :-** साहेब, प्रशासनाने प्रस्ताव केव्हा पाठविला याच्या आगोदर.

**मा.आयुक्त :-** पाठवु या आपण

**श्री.प्रशांत नाईक :-** पहिले पाठविलेलाच नाही का ?

**मा.आयुक्त :-** आकृतीबंधाचा प्रस्ताव आपण मागेही पाठविलेला आहे. आकृतीबंध मंजुर होणेच्या पार्श्वभुमीवर काही वेळ लागणार असेल शासन स्तरावर.

**श्री.नितीन लढढा :-** याच्या संदर्भात काय पाठपुरावा झाला, केव्हा पाठविला. आणि आता पर्यंत प्रशासनाकडुन त्याच्यावर काय काय पाठपुरावा झालेला आहे.

**मा.आयुक्त :-** आकृतीबंधाच्या बाबतीमध्ये जस मी म्हटल की, मुळ आकृतीबंध सन २०१८-१९ मध्ये पाठविला होता. त्याच्यानंतर राज्य शासनाने त्याच्यात काही त्रृटी दर्शविलेल्या होत्या. त्या त्रृटींची पुर्तता करुन परत पाठविला आहे.

**श्री.नितीन लढढा :-** म्हणजे कोणत्या तारखेला पाठविला होता. कोणत्या तारखेला आला आणि त्याच कॉमप्लायन्स कोणत्या तारखेला गेल.

**मा.आयुक्त :-** आणि मी म्हटल जस, आधी आपल्याला नगरविकास विभागाच्या सर्वोच्च पातळीवर आलेल आहे. नगरविकास मंत्रीच्या बैठकीत सुध्दा हा विषय आपण मांडलेला आहे. लेखी प्रस्ताव मध्ये मांडलेला आहे की, आमचे जे राज्य शासनाच्या स्तरावर प्रलंबित विषय आहे. त्याच्यामध्ये आम्हाला आकृतीबंध, दुकानदारांच्या बाबतीतला विषय आणि अजुन दोन तिन विषय आहे. हे विषय आपण राज्य शासनाच्या समोर मंत्री महोदयांच्या समोर मांडलेले आहे. आणि या विषयावर तातडीने निर्णय घेण्याच्या सुचना नगरविकास मंत्र्यांनी नगरविकास विभागाला दिलेले आहे. १ डिसेंबरला झालेली ही बैठक आहे.

**श्री.नितीन लढढा :-** केव्हा पाठविल होत आकृतीबंध, आणि त्रृटी केव्हा शासनाने पाठविल्या. आणि त्याच कॉमप्लायन्स कोणत्या तारखेला झाला.

**आस्थापना अधिक्षक, श्री.राजेंद्र पाटील :-** आदरणीय सभापती, आदरणीय सभागृह, सन २०१९ साली तत्कालीन आयुक्त श्री.निंबाळकर साहेब असतांना आकृतीबंध तयार करुन पाठविण्यात आलेला होता.

**श्री.नितीन लढढा :-** काय तारख होती.

**श्री.कुलभुषण पाटील :-** अंदाजित सांगा ना राजु भाऊ.

**आस्थापना अधिक्षक, श्री.राजेंद्र पाटील :-** तारखा देतो मी आपल्याला, पाठविल्यापासुन तर आता पर्यंत कुठपर्यंत कार्यवाही करण्यात आली. त्याच्या आलेल्या पाठविलेल्या तारखा मी सभा सुटल्यानंतर आर्ध्या तासाच्या आत देतो. पण निंबाळकर साहेब असतांना आपण आकृतीबंध पाठविला होता त्यानंतर आपण. त्यानंतर टेकाडे साहेब आले त्यावेळेला आकृतीबंध दुरुस्ती करुन पाठविलेला आहे. एक आठ दिवसापुर्वी कक्ष अधिकारी साहेबांनी फोन करुन चर्चाही केली. त्यांनी सांगितल की, स्क्रुटीनी आहे त्याही पाठविण्यात आलेल्या आहे. आणि फायनल स्टेजला हे आहे आणि आमच्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्या ज्या युनियन आहेत या प्रकरणी आम्ही मुंबईला जाण्याचे ठरविलेले आहे. याच्यामध्ये आकृतीबंध आणि सेवा प्रवेश नियमावली मागच्या महासभेमध्ये काही त्रृटी होत्या, ४ क्लासला आणि लिपीकांना प्रमोशन नव्हत. प्रस्ताव नव्हता तो दुरुस्ती करुन पाठविण्यात आल्यात. या तिन्ही गोष्टींसाठी आम्ही आमच्या युनियन मार्फत आणि प्रशासनामार्फत आम्ही तात्काळ प्रयत्न करणार आहोत. आमची तयारी सुध्दा झालेली आहे जाण्याची, पाच सहा जणांचा आमचा गृप आहे अधिकाऱ्यांचा.

**श्री.नितीन लढढा :-** जायची तयारी झालेली आहे पण महुर्त निघत नाही.

**आस्थापना अधिक्षक, श्री.राजेंद्र पाटील :-** या आठवडयामध्ये आमच कक्ष अधिकारी साहेबांशी बोलण ही झालेल आहे. ७ वा वेतन आयोग, आकृतीबंध आणि सरळ सेवा प्रवेश नियमावली याबाबत पाठपुरावा चालुच आहे आमचा आणि ते होणार आहे ८ दिवसामध्ये आम्ही त्यांना भेटणार आहे. आणि आपली मदत सुध्दा आम्हाला लागणार आहे.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदय, हे सर्व ठाराविक उत्तर असतात. प्रशासन ज्या पध्दतीने सभागृहाला चालवत आहे. ते मी म्हणतो निषधार्थ आहे. आणि याच अनुषंगाने या अनुकंप धारकांना मागच्या महिन्यामध्ये ठरलेल्या आपल्या दृष्टीकोणातुन आणि ठरलेल्या प्रमाणे एका महिन्याच्या आत न्याय देण्याच्या संदर्भातल,जे आश्वासन प्रशासनाने दिलेल होत. मला वाटत त्या आश्वासनांची पुर्तता होणे तर दुरच आहे. परंतु मला नाही वाटत की, अजुन सहा महिने त्यांना न्याय मिळेल. अश्या पध्दतीने मी प्रशासनाचा निषेध करतो आणि त्या कर्मचाऱ्यांना आपण न्याय देऊ शकत नसल्या कारणाने या सभेचा मी सभा त्याग ही करतो.

**सदर अनुकंपाच्या विषयाबाबत सन्मा.सदस्य श्री.नितीन बालमुकुंद लढढा, श्री.प्रशांत सुरेश नाईक व श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे यांनी सभात्याग केला.**

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब, सभासदांच्या भावना इतक्या तिव्र भावना आहे. सभात्याग करावा लागत आहे. साहेब याचा गांभिय घ्या साहेब. नामुस्की आहे साहेब आपली प्रशासनाची की, वेळेवर काम नाही होत.

**मा.सभापती :-** अनुकंप या विषयावर आपण सभा संपल्यानंतर आयुक्त साहेब यांच्या दालनात सर्व महानगरपालिकेचे पदाधिकारी असतील, महापौर, उपमहापौर, सभागृहनेते, सर्व पक्षीय गटनेते यांच्यासोबत आपण बैठक घेऊ. आणि प्रशासनाच्या माध्यमातुन मला वाटत आपण लवकरात लवकर अनुकंपाचा प्रस्ताव हा शासनाकडे पाठवु. आपण नगरपालिकेच्या माध्यमातुन आलेला हा जो प्रस्ताव मंजुर करता येईल का ? त्याच्यावर प्रयत्न करु आणि महापालिकेच्या अधिनियमानुसार जो आपला आकृतीबंध आहे तो सुध्दा आपण आपले जळगांव शहराचे आमदार असतील मा.राजुमामा भोळे, तसेच आपले पालकमंत्री श्री.गुलाबरावजी पाटील, यांच्या माध्यमातुन लवकरात लवकर पाठपुरावा करुन आकृतीबंध सुध्दा कसा मंजुर करता येईल त्यासाठी प्रयत्न करु. आणि आज अनुकंपाचे जे कॅन्डीडेट असतील,त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करु. आता अजेंड्यावर आलेले विषय या सभेमध्ये पुर्ण करु आणि आयुक्त साहेबांच्या कार्यालयामध्ये बैठक घेऊ.

**सभापती :-** नगरसचिव यांनी विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करावी.

**नगरसचिव :- विषय क्र. १:-** दि.३०/१२/२०२० व दि.१२/०१/०२१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** विषय मान्य आहे.

**सौ.सरिता नेरकर :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.३१० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दि.३०/१२/२०२० व दि.१२/०१/२०२१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १०** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**अनुमोदक :- नेरकर सरिता अनंत**

**नगरसचिव :- विषय क्र. २:-** मनपा आयुक्त कार्यालयाकडील कार्यरत वाहन क्र.एम.एच.१९ एम.७४७४ स्विप्ट डिझायर या वाहनाची दुरुस्ती कामी मे.मानराज मोटर्स जळगांव यांना कार्यादेश देणेस व सदर वाहनाची दुरुस्ती करणेकामी येणारा रक्कम रु.४६,७८६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** विषय मान्य आहे.

**श्री.मुकुंदा सोनवणे :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३११ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा आयुक्त कार्यालयाकडेस वाहन क्र.एम.एच.१९ एम.७४७४ (स्विप्ट डिझायर) कार्यरत आहे. सदर वाहनाचे खालीलप्रमाणे दुरुस्तीचे कामे करणे आवश्यक व गरजेचे आहे. वाहन क्र.एम.एच.१९ एम.७४७४ या वाहनाचे प्रत्यक्ष तांत्रिक तपासणी केली असता तसेच मानराज मोटर्स प्रा.लि.,जळगांव यांचेकडील दि.३१/१२/२०२० रोजीच्या पत्रानुसार सदर वाहनाचे २१४९६६ कि.मी. पुर्ण झालेले आहे त्यामुळे पार्ट नं.४८५००७५J०३ (Box Assy, Strg Gear) नवीन टाकणे आवश्यक आहे तसेच Vehicle History चे अवलोकन केले असता आजपावेतो पार्ट नं.४८५००७५J०३ (Box Assy, Strg Gear) नवीन टाकलेला नाही.

| मनपा वाहन क्र.एम.एच.१९ एम.७४७४ (स्विप्ट डिझायर), (उत्पादीत वर्ष २०११) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्रं. | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| 1 | Service Kit, Old Swift Diesel - 1 nos | 11 | PRF Little Tree-Crisp N Cool Hangin - 1 nos |
| 2 | MGDO (15W40)-SHELL- | 12 | Strut Kit Swift -2 nos |
| 3 | Grease, Caliper Assy - 2 nos | 13 | Joint Comp, FR Stabilizer Bar -2 nos |
| 4 | Screen Wash 50ML - 4 nos | 14 | Mount, Front Stabilizer Bar -2 nos |
| 5 | Coolant (SG) NON AMINE - 3 Nos | 15 | MGP Rust Smash -1 nos |

| | | | |
|---|---|---|---|
| 6 | Brake Fluid GC1500AA (500 ML PACK) - 1nos | 16 | Seat, Rear Spring Upp -2 nos |
| 7 | Weight, Wheel Balance (20 Gram) - 2 nos | 17 | Seat, Rear Spring Low -2 nos |
| 8 | Weight, Wheel Balance (25 Gram) - 2 nos | 18 | Box Assy, STRG Gear -1 nos |
| 9 | Weight, Wheel Balance (30 Gram) - 2 nos | 19 | AC Dis-Infection -1 nos |
| 10 | T/UP Paint Clear Coat (GNP) - 4 nos | 20 | All Labour Charges |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५ (२) (२) हा अतिशय अपवादात्मक परिस्थितीमध्ये वापरणे आवश्यक आहे. तसेच सुटे भाग खरेदी करणेसाठी वाहन विभागाने वार्षिक निविदा बोलविणे आवश्यक आहे. असे निर्देश मुख्य लेखा परिक्षक यांनी यापुर्वीच दिलेले आहेत. त्याचप्रमाणे आयुक्त यांनी खालीलप्रमाणे मुद्देनिहाय निर्देश दिलेले आहेत.

१) वाहन विभागाने/विभागप्रमुख यांनी मुख्य लेखा परिक्षक यांच्या सूचनेप्रमाणे त्वरित वार्षिक निविदा प्रक्रिया राबवावी.

२) यासाठी वाहन विभागप्रमुख/सहा.आयुक्त सक्षम आहेत. सबब केवळ यासाठी अभियंता आवश्यक नाही.

३) पुढील दोन महिन्यात निविदा प्रक्रिया पुर्ण करावी.

४) निविदा प्रक्रियाअंती मक्तेदार निश्चित होईपर्यंतच्या कालावधीसाठी आवश्यक साहित्य खरेदीसाठीचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता मान्यतेसाठी स्थायी समितीस सादर करावा.

जा.क्र./वाहन व्यवस्था विभाग/०२९/२०२०-२१ दि.१४/०८/२०२० अन्वये स्थायी समितीच्या मान्यतेकरिता डॉकेट पाठविले असता स्थायी समितीने खालीलप्रमाणे निर्णय घेऊन ठराव क्रं.२६७ दि.२५/०८/२०२० पारित केला.

स्थायी समिती ठराव क्रं.२६७ दि.२५/०८/२०२० अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागवता वाहन व्यवस्था विभागासाठी कोणतेही साहित्याची खरेदी करु नये. प्रशासनाने साहित्याची व कामाची निकड पाहता दोन महिन्याऐवजी आठ दिवसांतच निविदा प्रक्रिया पुर्ण करावी व निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो प्रशासनाने मनपा वाहनाकरिता आवश्यक ते साहित्य खरेदी स्वत:च्या अधिकारात शक्य असेल तेवढेच खरेदी करावे. तसेच सन २०१३ ते २०१९-२० पावेतो दर वर्षी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागवता कोणकोणते साहित्य कोणकोणत्या विक्रेत्याकडुन खरेदी केले त्याची सविस्तर माहिती पुढील होणाऱ्या स्थायी समितीच्या सभेत सादर करावी असे संदर्भीय ठरावा अन्वये निर्देश दिले आहेत.

महानगरपालिका प्रशासकिय वाहन क्र.एम.एच.१९ एम.७४७४ स्विफ्ट डिझायर मध्ये वर नमुद प्रमाणे पार्टसह दुरुस्ती करणे तांत्रिकदृष्टया आवश्यक व गरजेचे आहे. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय भाग-२ मंत्रालय, मुंबई दिनांक १७ एप्रिल २०१५ अन्वये वित्तिय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला, उपविभाग - १ ते ५ प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारामध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यानुसार डिझेलवर चालणाऱ्या प्रत्येक वाहनासाठी प्रतिवर्ष रु.६०,०००/- वित्तीय मर्यादा निश्चित केलेली आहे. वाहन चालक यांनी दिलेल्या मागणी प्रमाणे वर नमुद दुरुस्तीची कामे पार्टसह करणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागवता अधिकृत विक्रेते मे.मानराज मोटर्स जळगांव यांच्याकडील इस्टिमेट नं.ES20001939, दि.२४/१२/२०२० अन्वये वाहन क्र.एम.एच.१९ एम.७४७४ स्विफ्ट डिझायर दुरुस्ती करणे कामी येणारा खर्च रक्कम रु.४६,७८६/- मात्रला मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १०** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- सोनवणे मुकुंदा भागवत**

**नगरसचिव :- विषय क्र. ३:-** जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.०१/०६/२०२० ते दि.०७/०६/२०२०, दि.०८/०६/२०२० ते दि.१४/०६/२०२०, दि.१५/०६/२०२० ते दि.२१/०६/२०२०, दि.२२/०६/२०२० ते दि.२८/०६/२०२०, दि.२९/०६/२०२० ते दि.०५/०७/२०२०, दि.०६/०७/२०२० ते दि.१२/०७/२०२०, दि.१३/०७/२०२० ते दि.१९/०७/२०२०, दि.२०/०७/२०२० ते दि.२६/०७/२०२०, दि.२७/०७/२०२० ते दि.०२/०८/२०२०, दि.०३/०८/२०२० ते दि.०९/०८/२०२०, दि.१०/०८/२०२० ते दि.१६/०८/२०२०, दि.१७/०८/२०२० ते दि.२३/०८/२०२०, दि.२४/०८/२०२० ते दि.३०/०८/२०२०, दि.३१/०८/२०२० ते दि.०६/०९/२०२०, दि.०७/०९/२०२० ते दि.१३/०९/२०२०, दि.१४/०९/२०२० ते दि.२०/०९/२०२०, दि.२१/०९/२०२० ते दि.२७/०९/२०२०, दि.२८/०९/२०२० ते दि.०४/१०/२०२०, दि.०५/१०/२०२० ते दि.११/१०/२०२०, दि.१२/१०/२०२० ते दि.१८/१०/२०२०, दि.१९/१०/२०२० ते दि.२५/१०/२०२० व दि.२६/१०/२०२० ते दि.०१/११/२०२० या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** अहवालाची माहिती घेतली. विषय मंजुर करण्यात यावा.

**सौ.सरिता नेरकर :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३१२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.०१/०६/२०२० ते दि.०७/०६/२०२०, दि.०८/०६/२०२० ते दि.१४/०६/२०२०, दि.१५/०६/२०२० ते दि.२१/०६/२०२०, दि.२२/०६/२०२० ते दि.२८/०६/२०२०, दि.२९/०६/२०२० ते दि.०५/०७/२०२०, दि.०६/०७/२०२० ते दि.१२/०७/२०२०, दि.१३/०७/२०२० ते दि.१९/०७/२०२०, दि.२०/०७/२०२० ते दि.२६/०७/२०२०, दि.२७/०७/२०२० ते दि.०२/०८/२०२०, दि.०३/०८/२०२० ते दि.०९/०८/२०२०, दि.१०/०८/२०२० ते दि.१६/०८/२०२०, दि.१७/०८/२०२० ते दि.२३/०८/२०२०, दि.२४/०८/२०२० ते दि.३०/०८/२०२०, दि.३१/०८/२०२० ते दि.०६/०९/२०२०, दि.०७/०९/२०२० ते दि.१३/०९/२०२०, दि.१४/०९/२०२० ते दि.२०/०९/२०२०, दि.२१/०९/२०२० ते दि.२७/०९/२०२०, दि.२८/०९/२०२० ते दि.०४/१०/२०२०, दि.०५/१०/२०२० ते दि.११/१०/२०२०, दि.१२/१०/२०२० ते दि.१८/१०/२०२०, दि.१९/१०/२०२० ते दि.२५/१०/२०२० व दि.२६/१०/२०२० ते दि.०१/११/२०२० या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १०** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**अनुमोदक :- नेरकर सरिता अनंत**

**सौ.उज्वला बेंडाळे :-** साहेब आपण ज्या नविन गाडया घेतलेल्या आहे. ते चालु झालेल्या आहेत का ?

**अग्नीशमन अधिक्षक, श्री.शशिकांत बारी :-** सन्मा.सभापती साहेब, सर्व वाहने चालु झालेली आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** एम.आय.डी.सी. मध्ये पण चालु झाली का ?

**अग्नीशमन अधिक्षक, श्री.शशिकांत बारी :-** एम.आय.डी.सी. हे आपल नाही, हे हस्तांतरण झालेल आहे. ते त्यांची स्वतंत्र व्यवस्था करणार आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** कारण मागच्या वेळेस विषय झाला होता की, एक गाडी तेथे उभी करावी. अस आमदार महोदयांनी पण सांगितल होत.

**मा.सभापती :-** मला वाटत, एम.आय.डी.सी. ला आपली जागा होती.

**अग्नीशमन अधिक्षक, श्री.शशिकांत बारी :-** नाही सर ती जागा त्यांचीच होती.

**मा.सभापती :-** मग आता आपल्याला एम.आय.डी.सी.ला वाहन थांबवायची आहे तर त्यासाठी काय पुर्तता करत आहे जागेची.

**अग्नीशमन अधिक्षक, श्री.शशिकांत बारी :-** त्यासाठी जागा पाहवी लागेल एम.आय.डी.सी.त.

**मा.सभापती :-** आहे का भोसले साहेब जागा तेथे.

**शहर अभियंता, श्री.अरविंद भोसले :-** जागा पाहावी लागेल, मागे पालकमंत्र्यांसोबत मिटींग झाली होती तर एम.आय.डी.सी. स्वत: तेथे फायरच्या गाडया उभ्या करणार होते. त्यांनी आपल्याला पत्र मागितलेल होत.उपायुक्तच्या सहीने पत्र दिलेल आहे. आता ते गाडया स्वत: तेथे उभे करणार आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** ती आपली जबाबदारी नाही.

**शहर अभियंता, श्री.अरविंद भोसले :-** ती आपली जबाबदारी नाही, त्यांनी पालकमंत्र्यांची मिटींग मध्येच सांगितल होत.

**मा.सभापती :-** पालकमंत्र्यांची मिटींग म्हणजे कोणती मिटींग.

**शहर अभियंता, श्री.अरविंद भोसले :-** एम.आय.डी.सी.ची मिटींग होती ती. तर मनपाकडुन मी गेलो होतो तेव्हा ते विषय झाला होता.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मग आता हे जे नविन गाडया झाल्या. ते कुठे कुठे आहे.

**अग्नीशमन अधिक्षक, श्री.शशिकांत बारी :-** सद्या आता जी नविन वाहने आहे, एक महाबळला आणि एक गोलाणी मार्केट अग्निशमन विभागाला आहे.

**मा.सभापती :-** मला वाटत, एक गाडी आपली येथेच पार्कींग मध्ये आहे.

**अग्नीशमन अधिक्षक, श्री.शशिकांत बारी :-** नाही सर, थोड काम बाकी होत त्या गाडीच तर काम करुन हजर करुन घेतल त्या गाडीला.

**नगरसचिव :- विषय क्र. ४:-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** माहिती घेतली, विषय मान्य.

**श्री.मुकुंदा सोनवणे :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३१३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१.प्रशासकीय आदेश क्र./पा.पु./११४ दि.२०/०१/२०२१ अन्वये वाघुर रॉ वॉटर पंपींग स्टेशन येथील ५०० एचपी विदयुत पंप, मोटार तसेच सबस्टेशन अंतर्गत असलेल्या विविध उपकरणे व साहित्य दुरुस्ती करणे कामी मक्तेदार मे.चोपडे इलेक्ट्रीकल्स एन्टरप्राईजेस, श्रध्दानगर पारस, बालापुर जि.अकोला यांचे वाटाघाटी अंती बाबवार सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१९,६६,४२१/- मात्र खर्चाची संविदा.

२.प्रशासकीय आदेश क्र./सा.बा./९८ दि.१९/०१/२०२१ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्रं.०७ यशवंत कॉलनी सि.स.क्रं.७२१४ या महानगरपालिकेच्या खुल्या जागेमध्ये सुशोभिकरण करणे कामी मक्तेदार डी.एच.पाटील,कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेपेक्षा १३.५०% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.८,१०,४५२/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

३.प्रशासकीय आदेश क्र./सा.बा./९९ दि.२५/०१/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१५ मधील त्रिभुणी माता मंदिरालगतच्या पुलास ॲप्रोच रस्ता बांधणे कामी मक्तेदार श्री.शिवाजी गणपत भंगाळे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ११% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.७,८६,३६८/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १० प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- पाटील कुलभुषण विरभान**
**अनुमोदक :- सोनवणे मुकुंदा भागवत**

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांना विनंती करतो की सर्वांनी राष्ट्रगीत साठी उभे राहायचे आहे.

राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**
**सभापती**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**